
ग्रंथाली
इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग,
ऑफ गोखले रोड (उ), दादर (प), मुंबई ४०००२८
दूरध्वनी : २४४७४८४३ ग्रँटरोड – २३८७५४८१/२३८९२४४५




# खेळ मांडला...

## विभावरी दांडेकर

रविवार, ६ मार्च २०११
सायंकाळी ५.३० वाजता
धुरू हॉल, दादर (प.)

प्रकाशन हस्ते
**डॉ. बापूसाहेब रेगे**

प्रमुख पाहुणे
**प्रकाशभाई मोहाडीकर, अशोक गोपाळ टिळक,**
**धनराज वंजारी, निलेश निमकर**

उन्मळून पडण्याचे अनेक प्रसंग आयुष्यात येऊनही, जिद्दीने 'जे. दत्त आणि कंपनी' उभी केली आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी खेळणी बनवणारी विश्वासार्ह संस्था म्हणून नावलौकिक मिळवला त्या कंपनीचे संस्थापक नाना जोशी यांचे हे अनुभवकथन.
वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षीही त्यांच्यात असलेला उत्साह तरुणांना लाजवणारा आहे. कष्ट, सचोटी आणि जिद्द यांची ही कथा अनुकरणीय आणि स्फूर्तिदायक आहे.
शालेय शैक्षणिक खेळण्यांचा व्यवसाय हा सकृतदर्शनी साधा वाटतो. पण त्यातले बारकावे, वैमनस्य, कष्ट इत्यादी अनेक कंगोऱ्यांनी वाचनीय झालेले हे पुस्तक 'बोलके' झालेले आहे आणि त्यामुळे ते अनेकांचा व्यक्तिमत्त्वविकास घडविणारे ठरेल हे निश्चित.

**आपण या समारंभास अवश्य यावे, ही विनंती.**
**सुदेश हिंगलासपूरकर/प्रदीप गुजर**

कार्यक्रमस्थळी मूळ १५० रुपयांचे पुस्तक ७५ रुपयांत मिळेल
व ग्रंथालीची अन्य पुस्तके सवलतीत उपलब्ध असतील.




**डॉ. पी.एस. रामाणी** यांच्यावर
हंगेरी सरकारतर्फे पोस्टाचे तिकीट



**आधुनिक विश्वामित्र!**
डॉ. उज्ज्वला दळवी

ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मार्च २०११ मूल्य १० रुपये

---

**उद्याचे नेतृत्व घडावे यासाठी...**
दिनकर गांगल

---


**संकल्पनाकोश**
जयवंत वसंत चुनेकर

---

**दिलीप रानडे यांचे कल्पित अवकाश आणि सत्याचा लक्ष्यवेध** – दीपक घारे



RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001




**संकल्पनाकोश** (खंड १)
**सुरेश वाघे**
**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३६० रुपये**

'ग्रंथाली'ने 'ज्ञानकोश' वर्गातला एक कोश प्रकाशित केला आहे. 'संकल्पनाकोश'. कोशकार आहेत सुरेश पांडुरंग वाघे.

ढगांचे प्रकार किती आहेत, ठाऊक आहे? हा कोश तुम्हाला ते सांगेल.

पर्वताचा 'कडा' तुम्हा-आम्हाला माहीत असतो; 'खिंड' माहिती असते. पण खोंडा? पाज? भोय? शहाड? पर्वताशी निगडीत ह्या संकल्पनांचा नेमका अर्थ ठाऊक आहे? तो जाणून घेण्याची जिज्ञासा असेल तर वाघे यांचा हा 'संकल्पनाकोश' तुमच्या मदतीला येईल.

ग्राशेर बम, साल्टारो कांग्री, राकापोशी ही पर्वतशिखरांची नावे विदेशी वाटतात? पण ती हिमालयाची भारतीय शिखरे आहेत ही माहिती तुम्हाला या कोशात मिळेल.

अशा प्रकारचे अगणित तपशील वाघे यांनी या 'संकल्पनाकोशा'त समाविष्ट केले आहेत आणि या कोशाचे संदर्भमूल्य वाढवले आहे. जिज्ञासापूर्तीचा परमानंद अनुभवण्यासाठी तुम्हाला हा संकल्पनाकोश मुळातच पाहावा लागेल.




**'वाहतूक ठप्प'चं प्रकाशन – लेखक अशोक दातार, निखिल वागळे, सुलक्षणा महाजन आणि सुधीर बदामी**

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.



**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**मार्च २०११ वर्ष ३१ वे,**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **'डॉग इट डॉग' –**
**दिलीप रानडे यांचे चित्र**
२००७, कॅनव्हासवर ॲक्रिलिक

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

डॉली मेंढीच्या क्लोनिंगमुळे अनुवंशशास्त्राबद्दलचे कुतूहल सर्वसामान्यांत निर्माण झाले. पुढे येणाऱ्या विविध वृत्तांतून त्याची, त्या त्या प्रगतीची माहिती मिळत राहिली. क्रेग व्हेंटरने डीएनए तयार केला आणि मानवाची प्रगती निसर्गावर विजय मिळवेल का, अशा प्रश्नापर्यंत पोचत असल्याचे वृत्त अचंबित करून गेले. परंतु हे शास्त्र तुकड्या-तुकड्यांनी आपल्यासमोर येते. तेवढ्यापुरत्या वाचनातून कुतूहल अधिक वाढते, पण त्याच्यातील तांत्रिकतेमुळे थोडे दुर्बोध होते. या अंकापासून 'रुची'तून अनुवंशशास्त्राची अथपासून सुबोध ओळख करून देणारी 'एका बीजापोटी' ही लेखमाला सुरू करत आहोत. डॉ. उज्ज्वला दळवी ती लिहीत आहेत. त्यांची लेखनशैली त्यांच्या 'सोन्याच्या धुराचे ठसके' या पुस्तकातून आणि त्यांच्या विविध नियतकालिकांतील लेखांतून आपल्या परिचयाची आहेच. आपणास हे लेख संग्रही ठेवावेसे वाटतील अशी खात्री आहे.

मानवी शरीरातील दोष दूर करणारे अनुवंशशास्त्र प्रगत होतानाच, रस्त्यांवर मात्र जी कोंडी वाढते आहे त्याचे दोष कोणते याबाबत आपण गंभीर दिसत नाही. या प्रश्नावर अशोक दातार यांनी 'वाहतूक ठप्प, बसू नका गप्प!' असे अभ्यासपूर्ण, आवाहन करणारे पुस्तक लिहिले आहे. त्यानिमित्त आयोजित परिचर्चेचा वृत्तांत या अंकात दिला आहे. वाढत्या कार-विकारावरचा उपाय आपल्याला विचारप्रवृत्त करेल.

'जनसंवाद' आणि 'थिंक महाराष्ट्र' ही आपल्या जिज्ञासेला जोपासणारी आणि सांस्कृतिक अध:पतनाला रोखणारी दोन सदरे आहेतच.

गेल्या तीस-पस्तीस वर्षांत ग्रंथालीने आपल्या ज्ञानपेशींना सबल करण्यासाठी वाचन अभिसरण चालू ठेवले आहे, ते असेच चालत राहील.

**– संपादक**

# अभिनंदन




डॉ. पी.एस. रामाणी

डॉ. पी.एस. रामाणी यांचा नुकताच हंगेरी सरकारनं त्यांच्या न्यूरोस्पायनल सर्जरीमधील भरीव कार्याबद्दल 'लाइफ टाइम अचिव्हमेंट ॲवार्ड' देऊन सन्मान केला आणि त्यांचं छायाचित्र असलेलं टपाल तिकीट प्रसृत केलं. ज्या मोजक्या मराठी कर्तबगारांची जागतिक पातळीवर दखल घेतली गेली त्यात झालेली डॉ. रामाणी यांची गणना भारतीयांनाही अभिमानास्पद आहे.

'ग्रंथाली'ने त्यांची 'ताठ कणा' हे आत्मकथन आणि 'सत्तरीचे बोल' ही दोन पुस्तके प्रसिद्ध केली आहेत.

त्यांच्या या सन्मानाबद्दल ग्रंथाली परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन.







दिनकर गांगल

ग्रंथालीचे संस्थापक-सदस्य दिनकर गांगल यांची कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रोहा येथे होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. १४-१५ एप्रिल रोजी हे संमेलन होत आहे.

केसरी, महाराष्ट्र टाइम्स या दैनिकांतून काम करत आपल्या संपादनकौशल्याचा ठसा त्यांनी उमटवला. ग्रंथालीचे संस्थापक-सदस्य म्हणून त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने महाराष्ट्रात एक अपूर्व चळवळ उभी केली. अनेकांना लिहितं करताना विविध विषयांची जी पुस्तकं ग्रंथालीनं निर्माण केली त्यात त्यांच्या संपादनाचा वाटा मोठा आहे.

को.म.सा.प.च्या संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची झालेली निवड आनंददायी आहे.

ग्रंथाली परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन.



अरुण साधू

भारतीय भाषांचे संवर्धन करणे, भारतीय भाषांतील लेखकांना उत्तेजन देणे, सांस्कृतिक कार्यक्रम करणे, या उद्देशाने काम करत असलेल्या भारतीय भाषा परिषद, कोलकाता या संस्थेच्या वतीने अरुण साधू यांना 'रचना समग्र पुरस्कार' १९ फेब्रुवारी रोजी कोलकाता येथे शहरयार या प्रख्यात उर्दू कवींच्या हस्ते देण्यात आला. एक लाख रुपये रोख व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

ग्रंथालीचे संस्थापक-सदस्य म्हणून महाराष्ट्रात एक आगळे ज्ञानपीठ उभारण्यात महत्त्वाची भूमिका निभावताना अरुण साधू यांनी पत्रकारिता, साहित्य, शिक्षण या क्षेत्रांतही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. राजकीय कादंबऱ्या, कथासंग्रह, नाटक, एकांकिका, स्तंभलेखन, अनुवाद असे विविध प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे.

ग्रंथाली परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन.

# आधुनिक विश्वामित्र!

**डॉ. उज्ज्वला दळवी**



मानवी जीवनातल्या अनाकलनीय गुणतत्त्वांच्या वारशाचा वेध घेणाऱ्या, निसर्गावर विजय मिळवू पाहणाऱ्या अनुवंशशास्त्राची अथपासून सुबोध ओळख करून देणारी लेखमाला या अंकापासून सुरू करत आहोत. त्याची प्रस्तावना करणारा हा लेख.

''अगबाई, बाळाचे डोळे घारे आहेत! तुमच्या घरात तर कुणाचेही नाहीत असे!''

''सासुबाईंच्या मामांचे होते ना! आणि माझ्या पणजीला तिची नातवंडं प्रेमानं 'घारोळी माऊ' म्हणायची. दोन्हीकडून आलाय हा रंग!''

''हो, छत्तीस पिढ्यांचे गुण येतात म्हणे!''

आपल्याला आपल्या आईवडिलां-कडून आनुवंशिक गुण मिळतात. त्यांना ते त्यांच्या आईवडिलांकडून मिळालेले असतात. त्याअर्थी आपल्याला दोन्हीकडच्या आजीआजोबांचे, म्हणजे एकूण चौघांचे गुण मिळतात. पण आजीआजोबांनाही ते त्यांच्या आधीच्या पिढीकडून आलेले असतात. असं मागे मागे जात राहिलं की छत्तीस पिढ्यांपूर्वी, साधारण हजार वर्षांपूर्वी, आपल्या, रक्ताच्या सख्ख्या नात्याच्या पितरांची संख्या २ गुणिले दोन गुणिले दोन... करत ६८ अब्ज अशी अगडबंब होते! हे शक्य नाही. या गणितात जातीतल्या जातीत, नात्यातल्या नात्यात झालेली लग्नं गणली नाहीत. तरीही तो हजार वर्षांपूर्वीचा आकडा एवढा मोठा होतो की त्यात आपल्या ओळखीच्या, आपल्या प्रदेशातल्या, जवळजवळ सगळ्या माणसांचा समावेश होतो. म्हणून तर बऱ्याच वेळा एका प्रदेशातली सगळी माणसं साधारण एकमेकांसारखी दिसतात.

हेच गणित अधिक मागेमागे नेलं तर जगातली सगळी माणसं माणसासारखी कशी दिसतात याचाही उलगडा होतो. पृथ्वीवर एकपेशीय जीव तयार झाला आणि त्यातून विविध प्रकारच्या सजीवांची सृष्टी निर्माण झाली. म्हणून तर माणसाच्या आणि बटाट्याच्या पेशींतही जे साधर्म्य आढळतं तेही आनुवंशिकच म्हणावं लागेल.

आनुवंशिक गुणांचं माहात्म्य हजारो वर्षांपूर्वी, नुकती शेती सुरू करणाऱ्या, तोवर भटक्या असलेल्या माणसानंच जाणलं होतं. शेतीसाठी त्यानं रानटी गव्हा-तांदळातलं भरदार दाणे देणारं शेलकं बियाणंच निवडलं होतं. निकोप खिल्लाराची पैदास करायची असेल तर बीजासाठी उत्तम जातीचा, सुदृढ खोंड वापरावा हे गुराख्यांना माहीत होतं. घरातल्या कुत्र्यामांजरांचे गुण त्यांच्या पिल्लांत उतरलेले दिसत होते. हे सारं कसं होत असेल, याचं कुतूहलही वाटलं असेल त्यांना.

पुढे कित्येक शतकं हा केवळ कौतुकाचा विषय राहिला.

इसवीसनाच्या एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर डार्विननं उत्क्रांतिवादाचा प्रस्ताव मांडला. लोक त्यानं भारावून गेले. पुढच्याच दशकात ग्रेगोर मेंडेल या ऑस्ट्रियन धर्मगुरूनं वाटाण्याच्या रोपट्यांच्या पिढ्यांवर प्रयोग केले आणि त्याला आनुवंशिकतेचे सोपे नियम समजले. ते आपणही पुढील लेखात नंतर जाणून घेणार आहोत. त्या प्रयोगांपासून जेनेटिक्स या आधुनिक-शास्त्राच्या अभ्यासाला खरी सुरुवात झाली.

त्याच सुमाराला मीशर नावाच्या स्वीस शास्त्रज्ञाला पू भरलेल्या बॅण्डेजांमध्ये एका अनोळखी आम्लाची रेलचेल आढळली. त्या आम्लाचा संबंध आनुवंशिकतेशी असावा असा अंदाज त्यानं बांधला. हे आम्ल म्हणजेच डीएनए (डीऑक्सिरायबो न्यूक्लेइक ॲसिड).

विसावं शतक उजाडेपर्यंत या दोन्ही शोधांकडे जगानं पूर्ण दुर्लक्ष केलं.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच काही मानवी रोगांचा आनुवंशिकतेशी संबंध असतो हे सिद्ध झालं. माणसांवर आनुवंशिकतेचे प्रयोग करणं शक्य नाही म्हणून अल्पजीवी, बहुप्रसव अशा चिलटांच्या

वंशावळीचा अभ्यास सुरू झाला. क्ष-किरण वापरून चिलटांमध्ये आनुवंशिक रोग निर्माण करता आले. त्याचे आनुवंशिक परिणाम अभ्यासता आले. शतकातली तीन वेगवेगळी नोबेल पारितोषिकं या चिमुरड्या जीवांच्या अभ्यासाखातर दिली गेली!

अशा प्रयोगातून १९४१ साली जनुकांचा (जीन्स) आणि प्रथिनांचा परस्परसंबंध ध्यानात आला. जनुकं पेशींच्या केंद्रात असतात. ती केंद्राबाहेरचा समस्त कारभार चालवतात आणि त्यात प्रथिनांचा (प्रोटिन्स) कामगार म्हणून वापर करतात हेही समजलं.

१९५३ साली वॉटसन आणि क्रिक या केंब्रिज विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी त्यांच्या प्रयोगशाळेत, तारा-नळ्या जोडून डीएनए-रेणूच्या रचनेचं चक्क शिल्पच उभारलं. वंशपरंपरेची किमया करणाऱ्या, जीवनाचं सगळं कामकाज चालवणाऱ्या त्या अद्भुत रेणूचं गुपित फुटल्यावर बरीच कोडी झपाट्यानं सुटत गेली.

पुढचं संशोधन एकलक्ष्यी झालं.

थॉमस हंट मॉर्गन याला जनुकांचा सखोल अभ्यास करताना डीएनएचं रासायनिक पृथक्करण केल्यावर चार घटक मिळाले. त्यांना दिलेल्या नावांच्या आद्याक्षरांनी ते ओळखले जातात. ते ॲडनिन, ग्वानिन, सायटोसिन व थायमिन असे आहेत. हे चार घटक आनुवंशिकतेची चार मूळाक्षरे होत.

त्यानंतर पंधराच वर्षांत भारतीय वंशाच्या डॉ. हरगोविंद खोराना यांना डीएनएची भाषा (जेनेटिक कोड) तीन-तीन अक्षरी शब्दांची आहे हे समजलं. या शब्दांची जी वाक्यं बनतात ती म्हणजे जनुकं. एकेका जनुकात प्रथिनांची कृती, ती बनवण्यासाठी, त्यांच्या कामांसाठी, लागणारे सगळे आदेश दिलेले असतात. पेशींच्या केंद्रात बसून जनुकं केंद्राबाहेरचा समस्त कारभार चालवतात. तिथे बाहेरच प्रथिनं बनवतात आणि पुढची कामं प्रथिनांकडून करून घेतात. डॉ. खोरानांनी ही डीएनएची, जीवनाच्या मूळाक्षरांची, भाषा वापरून या कारभारातल्या काही छोट्या आज्ञाही दिल्या आणि लहानगी प्रथिनं तयार करून घेतली.

हे कसब फार मोलाचं ठरलं. तुटपुंजं का होईना, ते ज्ञान वापरून सूक्ष्म जंतूंना मानवी इन्सुलिनची कृती सांगता आली. जंतूंमध्येही डीएनए (प्रथिनं) यांच्या कारभाराचा कारखाना असतोच. फक्त त्यांना वेठीला धरून, तोपर्यंत मानवी पेशींतच तयार होणारं इन्सुलिन त्यांच्याकडून बनवून घेता आलं. मानवी शरीरातल्या अभावावर ते गुणकारी ठरलं. तेव्हापासून त्यासारखी जीव वाचवणारी कित्येक औषधं मोठ्या प्रमाणात तयार व्हायला लागली. रोगप्रतिबंधक लशींचंही याच प्रकारे उत्पादन झालं.

जनुकांतल्या कमतरतेमुळे काही जणांमध्ये रोगप्रतिकारशक्ती अतिशय कमी असते. साधी सर्दीही त्यांना जीवघेणी ठरू शकते. अशीच एक चार वर्षांची मुलगी होती. तिच्या जनुककोशात जी उणीव होती तेवढीच दुरुस्त करून तिला तिची रोगप्रतिकारशक्ती परत मिळवून देता आली. या दुरुस्तीसाठी मदत घेतली गेली ती पेशीच्या केंद्रांपर्यंत पोचू शकणाऱ्या विषाणूंची म्हणजे व्हायरसांची!

आनुवंशिक रोगांचं निदान लवकर, अगदी गर्भात असतानाही करणं जनुकचाचण्यांमुळे जमलं. गर्भधारणेपूर्वीच योग्य तो सल्ला (जेनेटिक काउन्सेलिंग) मिळायला लागला. कृत्रिम गर्भधारणेत निरोगी फलित निवडून त्याचं रोपण झालं आणि आईबापांतले आनुवंशिक दोष टाळून अव्यंग बाळ जन्मण्याची शक्यता वाढली. त्याभोवती वादंगही माजलं.

नव्या पद्धती (PCR) वापरून क्षयरोगाचं निदान एका दिवसात व्हायला लागलं. एड्स, हेपॅटायटिस बी, स्वाइन फ्लू यांचंही अचूक, झटपट निदान जमलं.

माणसांवरील उपचार शोधताना भाज्यांवरही प्रयोग झाले. मोठ्ठाले बटाटे, टिकाऊ टोमॅटो यांची पैदास झाली. नव्या जीन्सच्या तुमानी चढवून भरदार मका-गहू-तांदूळ आले आणि मागासलेल्या देशांत हरितक्रांती झाली.

तरीही, मिळालेली विद्या काठावरची, चुळकाभरच होती. म्हणून मानवी पेशीतल्या डीएनएच्या संपूर्ण साठ्यातल्या मजकुराचा, त्या जीवनग्रंथाचा (Human Genome), अर्थ नीट समजून घेण्याचा, जनुकसंचयाचा तक्ता तयार करायचा बहुराष्ट्रीय प्रकल्प नव्वद साली सुरू झाला.

हे काम किती कठीण होतं याचं सोपं उदाहरण देता येईल. समजा, अगदी बारीक छपाईच्या दहा हजार पानांचा तामीळ भाषेतला, तोच जिलब्यांच्या लिपीतला, थोरला ग्रंथ पूर्ण समजून घ्यायचा आहे. त्याला ना अनुक्रमणिका, ना शब्दसूची. त्या भाषेतले काही थोडेसेच शब्द अवगत आहेत. ते देखील पुस्तकात कुठेतरी विखुरलेले आहेत. तामीळ शब्दकोश जवळ नाही. होईल ना पंचाईत?

मग ह्युमन जीनोम या ग्रंथात वापरलेली जनुकांची भाषा (जेनेटिक कोड) तर फक्त चार मूळाक्षरांची, सगळ्या मिळून चौसष्ट शब्दांची, जगातली सर्वांत कठीण भाषा! हा जो ग्रंथ वाचून समजून घ्यायचा होता त्यात २५००० वाक्यं (जीन्स) होती आणि या वाक्यांची सरासरी लांबी होती १०००० शब्दांची!

आणि तरीही हे किचकट काम मनोभावे करून शास्त्रज्ञांनी २००३ साली तो प्रकल्प पूर्ण केला. त्या धडपडीत जनुकांचा अभ्यास करायच्या कित्येक नव्या पद्धती आणि युक्त्या त्यांच्या गाठीशी जमल्या. जनुकभाषेचे अनेक बारकावे ध्यानात आले. साऱ्या माणसांच्या अंतरीचा ज्ञानलेख किती एकसारखा असतो ते नव्या रीतीने मनावर ठसलं! इतकंच नव्हे तर डुकराची आणि माणसाची जनुकं बरीचशी सारखीच असतात हा सर्वजीवसमभावही जागला! हे एक पर्व म्हणजे ज्ञानाची पर्वणी झाली!

या तपश्चर्येच्या सोबतच सुरू झालेली दुसरी, अक्षरशः जगड्व्याळ शोधयात्रा म्हणजे जगाच्या पाठीवर, समुद्राच्या पोटात, हवेच्या आवरणात विखुरलेल्या सगळ्या जीवसृष्टीच्या जनुकसंचयांची जंत्री करून ती रीतसर नोंदणं! त्याच्यासोबत पर्यावरणाच्या परिणामांचीही दखल घेतली जाते आहे. ही पृथ्वीयात्रा इतक्या झपाट्यानं पुरी होणं शक्य नाही. पण तिथेही अभ्यासकांच्या चिमणचोचींत एव्हाना चिक्कार चारा जमला आहे.

हे हावरटासारखं जे ज्ञान गोळा केलं त्याच्या पसाऱ्याला आता दहा दिशा तोकड्या झाल्या आहेत. जिथे पाहावं तिथे ते नवी दारं उघडून धावत सुटलं आहे.

जनुकांत चुका झाल्या की प्रथिनांत गडबड होणार. मग चाचण्या करून प्रथिनांची विचारपूस केली की जनुकांची हालहवाल मिळणार. हा होरा खरा ठरला आहे. याचाही रोगांच्या निदानाला फायदा झाला.

प्रथिनं हे जनुकांचे कामकरी. त्यामुळे कित्येकदा जनुकांच्या चुका सुधारताना प्रथिनांचेच कान पिळले की पेशींचं पुढचं काम सुरळीत होतं. अशी सुधारलेली प्रथिनं प्रयोगशाळेत तयार करता येतात. कित्येक आनुवंशिक रोगांवर, असाध्य वाटणाऱ्या दुखण्यांवर अशी अभिनव औषधं तयार झाली आहेत, होत आहेत. अशी औषधं प्रत्येकाच्या प्रकृतीप्रमाणे बेततातही येतील.

घातक किरण, विषारी रसायनं यांचे जनुकांवरचे नेमके दुष्परिणाम लवकर समजणं आणि टाळणं आता शक्य झालं आहे.

आता पितृत्व नाकारण्याचा प्रयत्न कुणी करू नये. मुलाच्या पेशीपेशींत, जनुकीय भाषेत, त्याच्या पुराव्याच्या प्रती मिळतील!

अवयवांचं रोपण (ट्रान्सप्लान्ट) करण्यापूर्वी जनुकांचे तक्ते पडताळून दात्याची नेमकी निवड होऊ शकेल. काही पेशी तर प्रयोगशाळेत जोपासून त्यांचं रोपण करता येईल.

संशयित गुन्हेगारांच्या बोटांचे ठसे न तपासता आता गुन्ह्याच्या जागी त्यांचे जनुकठसे शोधून निःसंशय खरा गुन्हेगार पकडता येईल. अट्टल गुन्हेगारांचे जनुक-तक्तेच पोलीसखात्यात जमा झाले आहेत.

९/११च्या हल्ल्यात बळी पडलेल्यांपैकी ८०० लोकांची ओळख निव्वळ डीएनए चाचण्यांनीच पटली. आता कुंभमेळ्यात हरवलेल्या भावाचा शोध घेताना जनुकतक्त्याचा वापर होईल!

९६ साली क्लोनिंगनं डॉली मेंढी जन्मली. आता तर तास्मानियन टायगर नावाच्या, नामशेष झालेल्या प्राण्याचे म्युझियममधले अवशेष धुंडाळून, त्यांतला डीएनए जिवंत उंदराच्या पेशींत जोपासून त्याच्या गुणधर्मांचा अभ्यास चालू आहे.

---

जनुकशास्त्राचा जनक, मेंडेल, याचे वाटाण्यांचे नियम काही मानवी गुणांना कसे लागू पडतात हे आपण पुढच्या अंकातल्या लेखात बघणार आहोत. त्या निमित्ताने या शास्त्राच्या आद्य अभ्यासकाला पहिला दंडवत पोचेल.

---

अलास्काच्या समुद्रात खनिज तेल सांडलं आणि एक्झॉन कंपनीनं तेलखाऊ जंतूंची मदत घेतली. त्याचा फारसा फायदा झाला नव्हता. पण आता, जेनेटिक इंजिनीयरिंग वापरून, फक्त खनिज तेलावरच जगणारे जंतू बनवायचा प्रयत्न चालू आहे.

एकेका व्यक्तीच्याच नव्हे, आता समग्र समाजाच्याच जनुकांचा अभ्यास सुरू झाला आहे. त्यात कालपरत्वे होत जाणारा बदल नोंदला जाईल. उत्क्रांतिवादासाठी नवे दाखले मिळतील. त्यात हरपू पाहणारी चांगली गुणतत्त्वं (जनुकं) जपता येतील, त्रासदायक गुणतत्त्वांची आस्ते आस्ते हकालपट्टी करता येईल.

या शास्त्रानं जन्माची शक्यता वाढवली, जगण्याची क्षमता वाढवली, भविष्यातल्या बदलांची दिशा दाखवली. इथवर ते थांबलं नाही. एकदा डीएनएच्या मूळाक्षरांची ओळख झाल्यावर पेशीपेशीत लिहून ठेवलेलं मृत्यूचं भाकीत वाचायलाही शिकवलं. पेशींत लिहिलेली सारी आजन्मचर्या उलगडून दाखवली.

जगातल्या पहिल्यावहिल्या जीवनाची, आदिपेशीची उत्पत्ती झाली तेव्हापासून 'वासांसि जीर्णानि यथा विहाय'– आईपेशीकडून कन्यापेशींकडे, जीवनाकडून जीवनाकडे, चालत आलेला जगातल्या साऱ्या जीवनाचा मूलाधार असलेला डीएनए, स्वतः मात्र निर्जीव आणि बराचसा निर्विकार आहे! शुष्क दगडांत किंवा अंबर डिंकाच्या खड्यांत तो हजारो वर्षं टिकून राहू शकतो. याचं जेवढं अधिक अध्ययन होईल तेवढं उत्पत्ती, उत्क्रांती, पुरातन काळातली विपरीत परिस्थिती या साऱ्यांचं गूढ अधिक उलगडत जाईल.

विसावं शतक जनुकशास्त्राचं होतं. एकविसावं या नव्यानं उघडलेल्या, आठशे खिडक्या, नऊशे दारांपलीकडल्या, उलगडत्या रहस्यांचं आहे. शास्त्रज्ञांचं तप चालूच राहील. मात्र त्या तपःसामर्थ्यानं ब्रह्मदेवाला शह देण्याच्या फंदात त्यांनी पडू नये. तेवढं सामाजिक, नैतिक भान त्यांना राहावं म्हणून आपण जागरूक राहिलं पाहिजे. निदान त्यांच्या शोधांतून काय निष्पन्न होतंय आणि त्यातून आपल्याला व्यक्तिगत फायदातोटा काय होईल इतकं तरी जाणून घेतलंच पाहिजे.

या शोधांतलं जंतरमंतर दूर व्हावं आणि शास्त्रीय जाणीव वाढावी एवढ्याच उद्देशानं ही लेखमाला सुरू केलेली आहे. ही जेनेटिक्सची पाठशाळा नाही. गरज भासली तिथे काटेकोरपणाला थोडा फाटा देऊन गोष्टी जमतील तेवढ्या सोप्या करून सांगायचा प्रयत्न केला आहे. त्याचा सर्वसामान्य वाचकाला फायदा व्हावा, इतकीच नम्र अपेक्षा आहे.

**डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

# उद्याचे नेतृत्व घडावे यासाठी...

**दिनकर गांगल**

काळ स्थित्यंतराचा
भौगोलिक विलयाचा
आर्थिक उदयाचा
राजनैतिक क्षयाचा
आक्रसलेल्या हृदयांचा
तांत्रिक विस्मयाचा
गतिमान समयाचा
आणि सांस्कृतिक पर्यावरणाचा!

ही पद्यसमान रचना आहे डॉ. अभय बंग यांची. त्यांनी या काव्यात्म ओळींनी दोन दिवस चाललेल्या विचारमंथनाचा समारोप केला. त्याचबरोबर त्याचे स्पष्टीकरण व त्यात काही खोचा आहेत, त्या उलगडून दाखवल्या.

अभय बंग यांनी वयाची साठ वर्षे गेल्या सप्टेंबरमध्ये पूर्ण केली. त्या निमित्ताने त्यांचे दोन मित्र, विवेक सावंत (संचालक, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि.-एम.के.सी.एल) आणि अनिल शिदोरे (संचालक, महाराष्ट्र नवनिर्माण अॅकेडमी) यांनी महाराष्ट्रातील स्वयंसेवा क्षेत्रातील पंचवीस-तीस समाजचिंतकांना बोलावून हे विचारमंथन घडवून आणले होते, पुण्यात, वारजे येथील 'बायफ'मध्ये. दोन दिवसांच्या या चर्चासत्रानंतर लगेच, तिसऱ्या दिवशी अभय बंग यांनी सुमारे तीन हजार तरुणांना 'संबोधित' केले. 'त्यांचे भाषण भारून टाकणारे झाले. गेल्या पंचवीस वर्षांतील पुण्या-मुंबईकडील प्रभावी पाच भाषणांमध्ये त्याचा समावेश होऊ शकेल' असे अभय बंग यांच्या त्या दीड तासाच्या 'एकपात्री कार्यक्रमा'चे वर्णन केले गेले.

त्या विचारमंथनाबद्दल थोडेसे... परिस्थितीचे आकलन आणि वर्णन सारेच करतात, परंतु मुद्दा आहे तो जग बदलण्याचा असे वाक्य वीस-पंचवीस वर्षांपूर्वीपर्यंत प्रचलीत होते, कारण जग बदलण्याचे डावे-उजवे मार्ग आणि त्यांचे अनेक श्लेष जगाला माहीत होते. गेल्या वीस वर्षांत हे चित्र पालटून गेले. तंत्रविज्ञानाने समाजावर काबू मिळवला. त्या आधीचे सर्व विचारप्रवाह मानवी समाजात मुरून गेले अथवा ते गैरलागू झाले आणि रुजू पाहणाऱ्या समतावादी मूल्यव्यवस्थेच्या नव्या परिमाणांचा शोध सुरू झाला. स्थानिक संदर्भात बोलायचे तर, मेधा पाटकर आणि मंडळींची 'पर्यायी विकासनीती' विद्यमान 'डेव्हलपमेंट मॉडेल'च्या विरोधापलीकडे जाऊ शकली नाही आणि 'एनजीओं'ची तथाकथित तिसरी शक्ती भ्रष्टाचारी व्यवस्थेची अंकित झाल्याचे जाणवत गेले.

हे खरे, की राजकारणात मेधा पाटकर जितकी सच्ची व लढाऊ आहे तितक्याच अभय बंग, प्रकाश आमटे, शशिकांत अहंकारी, शारदा साठे यांच्यासारख्या समाजसेवा क्षेत्रातील व्यक्ती व त्यांचे कार्य आणि त्यांच्या संस्था यादेखील प्रामाणिक आहेत. वनवासी कल्याणाश्रमातल्यासारखे हजारो कार्यकर्तेही त्यागभावनेने व निष्ठेने कामे करतात. पण ते सारे त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात. त्या सर्वांना एकेकाळी 'भूमिका' होती. त्यांच्या कामास व्यापक दिशा होती. ती भूमिका व दिशा गेल्या दशका-दोन दशकांत जाणवेनाशी झाली. अशा पार्श्वभूमीवर बंग यांच्या मुख्य उपस्थितीत चर्चासत्राचा हा घाट घातला गेला होता. विद्या बाळ, अनिल अवचट यांच्यापासून राष्ट्रसेवा दलाचे सुभाष वारे, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे विनय सहस्रबुद्धे यांच्यापर्यंत अनेक विचारछटांचे आणि पंचाहत्तरीपासून चाळिशीपर्यंतच्या वेग-वेगळ्या वयोगटांतले कार्यकर्ते हजर होते. त्यांनी प्रत्येकाने मागील काळातील चुकांची कबुली, विद्यमान काळाचे आकलन आणि भविष्यकाळाचा वेध अशा तीन कोनांतून पंधरा मिनिटे मांडणी करावी. मग बाकीच्यांनी त्यांना प्रश्न विचारावे अशी चर्चेची आखणी केली गेली होती. चर्चासत्राचे सूत्रसंचालन अनिल शिदोरे यांनी उदारतेने पण नेमकेपणाने केले. विशेषतः, ते प्रत्येक सत्रात आधीच्या चर्चेचे समर्पक समालोचन करत व त्यामुळे उपस्थित प्रत्येक जण सजग राही. अभय बंग यांनी या उपक्रमाचे 'संगिती' असे बौद्ध विचारपीठाप्रमाणे वर्णन केले आणि उपस्थितांची गणना, त्यांचे ज्येष्ठत्व व अनुभव ध्यानी घेऊन 'वैदिक ऋषिपरंपरेतले' अशी केली. त्यांनी अचूक 'अजेंडा' मांडला, की 'उद्याचे नेतृत्व घडावे यासाठी आपण काय करावे हा आपल्यापुढील प्रश्न आहे!'

चर्चेचा आरंभ कट्टर डाव्या गटाचे कार्यकर्ते मानले गेलेले व आता भांडवलशाही व्यवस्थेत स्वतःची 'कन्सल्टन्सी' सेवा असलेले आनंद करंदीकर यांनी केला. त्यांनी आयटीच्या व एकूणच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने दारिद्र्य निर्मूलन कसे

शक्य होईल याचे, त्यांच्या स्वत:च्या प्रयोगाचा दाखला देऊन वर्णन केले. त्यानंतरच्या माझ्या निवेदनातही, तंत्रज्ञानाच्या झपाट्यातून असुरक्षितता आलेली आहे आणि करिअर हाच ध्यास असल्याने तरुणांकडून फार अपेक्षा ठेवता येणार नाहीत असे मुद्दे होते. त्यांतला करिअरचा धागा उचलून अभय बंग यांनी तरुणांची ओढ तीन 'सी'नी-कनेक्टिव्हिटी, कंझ्युमिंग, करिअर-चौथ्या 'सेक्स पार्टनर' या घटकाने सुरू होते व तेथेच संपते असे सांगितले. तेव्हा 'ज्ञानप्रबोधिनी'च्या विवेक कुलकर्णी यांनी 'सेक्स पार्टनर'साठी 'सी'ने सुरू होणारा कंपॅनियन हा चौथा शब्द सुचवला आणि नंतर 'कम्युनिटी' हा समर्पक शब्दही तरुणांच्या सध्याच्या प्रेमविषयांना जोडला गेला. त्यामुळे ती 'सी'ची पंचकडी बनून गेली.

चर्चेच्या पहिल्या तासाभरातच भविष्यवेधाच्या आशंकेने चर्चेला उत्कटता व कातरता आली होती. ती अनिल अवचट यांनी आर्ततेने मांडली. त्यांचे निवेदन आतून आले होते. त्यांनी अखेरीस प्रश्न केला, की 'आपण मानव समाज आहोत याचे आपल्याला भान तरी राहिले आहे का?' त्यांनी जातिभेदापासून पर्यावरणापर्यंतचे अनेक मुद्दे मांडत माणुसकीच कशी नष्ट होत चालली आहे याची प्रखर जाणीव करून दिली. त्यात कलासंस्कृतीचा लोप होत असल्याची खंत विशेषत्वाने जाणवत होती.

चित्रपट दिग्दर्शक सुनील सुकथनकर यांनी अवचट यांच्या कलाक्षेत्रात आलेल्या तात्कालिकतेबाबतचा धागा पकडला. ते म्हणाले, की कलाकारांना फार प्रेशरखाली काम करावे लागते. विचारचिंतनाला उसंतच मिळत नाही. जो कॅमेरामन आज इकडे राखी सावंतला 'शूट' करतो, त्याला दुसऱ्या दिवशी विनोबा भावे यांच्या आश्रमावर 'फिल्म' बनवायची असते! त्यांनी छोटे दाखले देत कलावंताची आजच्या काळातील शोकांतिका वर्णन केली. संवेदना हरपून टाकणारा हा काळ आहे असे ते म्हणाले.

सोलापूरचे निसर्गवादी अरुण देशपांडे हे खिल्ली उडवण्यात पटाईत. त्यांनी 'ग्रीन अमेरिके'चे झकास वर्णन केले. ते म्हणाले, की हे अमेरिकन पर्यावरणवादी स्वतः बादलीत बसून ती बादली उचलण्याचा प्रयत्न करत आहेत! त्यांनी पुढे हसत सांगितले, की त्यांनी बॉम्बला 'ग्रीन' रंग द्यायचा तेवढा राहिला आहे. तो दिला, की पाश्चात्य जगाचे पर्यावरणाचे प्रयत्न पूर्ण होतील. त्यांचा भर अर्थातच नैसर्गिक जीवनशैलीवर व त्यासाठी करायच्या प्रयोगावर होता. त्यांनी श्री. अ. दाभोलकर यांच्या 'बायोमास' दृष्टीचा व त्यांनी महाराष्ट्रात घडवून आणलेल्या क्रांतीचा वारंवार उल्लेख केला.

सदा डुंबरे व रमेश पानसे यांची भाषणे म्हणजे 'केस स्टडी' होते. डुंबरे यांनी पत्रकारिता कशी दुर्गतीला पोचली आहे हे अनेक उदाहरणे देऊन सांगितले, तर रमेश पानसे यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची दुरवस्था वर्णन केली. त्यांनी त्या क्षेत्रांतले नवे संशोधन, प्रयोग नमूद केले. ते दृष्टी बदलून टाकणारे होते. त्यामुळे प्रभावित होऊन त्यांच्या शिक्षणविषयक मोहिमांत सामील होण्यास उपस्थितांनी तत्काळ तयारी दाखवली.

विनय सहस्रबुद्धे यांचे निवेदन नेटके, मुद्देसूद व परिस्थितीचे वास्तव वर्णन करणारे होते. विशेषतः त्यांनी गेल्या काळातील समाजाच्या चुका परखडपणे माडल्या. त्यांनी वैचारिक कप्पेबंदी, संस्थाबांधणीकडे दुर्लक्ष, लोकानुरंजनास प्राधान्य, साध्या राहणीचे 'एंजॉयमेंट'मधील रूपांतर असे दोष निदर्शनास आणून दिले. त्यांनी ठासून सांगितले, की प्राध्यापक, पत्रकार, राजकीय नेते व समाजातील कार्यकर्ते या चार समाजघटकांनी आपली, लोकहिताचा विचार करण्याची जबाबदारी सोडून लोकद्रोह केला आणि परिणामतः समाज आजच्या अधोगतीला येऊन ठेपला!

त्यांनी मूल्यसंघर्षाचा मुद्दाही छेडला. ते म्हणाले, की गेल्या काळातील त्याग, समर्पण, परिश्रम, प्रामाणिकपणा, निष्ठा ही मूल्ये गेली आणि उत्पादकता, कार्यक्षमता, सादरीकरण कुशलता ही नवी मूल्ये आली असे सांगितले गेले. जणू ही नवी मूल्ये आल्याने जुन्यांची गरज राहिली नाही! राष्ट्र सेवा दलाचे वारे यांनी सांगितले, की तरुणांचे व्यक्तिमत्त्व अनेक अंगांनी भंगलेले जाणवते. ते म्हणाले, की आमच्या ठिकठिकाणच्या मेळाव्यांमध्ये तरुण तीन प्रश्न विचारतात व त्यांचा जबाब आपल्याला देता येत नाही. ते प्रश्न सेक्युलॅरिझम, आरक्षण आणि गावपातळीवरील विकासाचे राजकारण, तेथील कामांची उपेक्षा व त्यांतील घोटाळे यांबाबतचे असतात.

चर्चासत्राचे संयोजक खुद्द विवेक सावंत आणि 'बायफ'मधील दोन दिवसांची व्यवस्था पाहणारे गिरीश सोहनी हे दोघे पन्नाशीतले, आजच्या काळातले उच्चशिक्षित व्यावसायिक. त्यांच्या मांडणीत ते कौशल्य व तशी वस्तुनिष्ठता जाणवली. समाजाबद्दलचा कळवळा असूनही सामाजिक बाबींकडे निर्लेपपणे, अभ्यासू नजरेतून पाहण्याची त्यांची दृष्टी त्यांच्या प्रतिपादनाहून कितीतरी अधिक सांगून गेली!

गिरीश सोहनी म्हणाले, की समाजातील अंतर्मुखता खूप कमी होत चालली आहे. आपल्या जाणिवांवर इतका जबरदस्त मारा चोहोबाजूंनी होत आहे, त्यामुळे संवेदना समृद्धतेऐवजी बधिरता येत चालली आहे. उद्या 'फूल उमलताना ऐकलं' असा दावा कोणी केला, तर आपण म्हणू 'असेल बुवा'! समाजातली सर्व प्रकारची विविधता-भाषा, पोषाख यांच्यापासून व्यक्तिगत सवयी व आवडीनिवडीपर्यंत-कमी होत चालली आहे. जीवविविधता नष्ट होत असल्याची काळजी व्यक्त केली जाते, पण या व्यक्तिगत सवयींतील विविधता नष्ट होणे ही अधिक चिंताजनक बाब आहे आणि माणसाचे परिसराशी असलेले नातेच बदलून गेले आहे.

सोहनी यांना जाणवलेले सध्याचे हे समाजप्रवाह आहेत.

सोहनी हे अहमदाबादचे एमबीए

आणि त्यांनी बायफ या स्वंयसेवी संस्थेच्या कामात व व्यवस्थापनात गेली कित्येक वर्षे वाहून घेतले आहे. चर्चासत्रानंतर त्यांच्या-इतकीच छाप टाकलेले विवेक सावंत हे आजचे तंत्रवैज्ञानिक. परम संगणक बनवणाऱ्या संचातील एक कुशल तंत्रज्ञ. ते म्हणजे एमएससीआयटीच्या माध्यमातून सरकारला व मराठी समाजाला संगणकाची भाषा शिकवणारे आपले 'मराठी' नारायण मूर्ती वा नीलकेणी!

सावंत म्हणाले, की हा देश तरुणांचा आहे, पण त्यांनाच येथील 'लोकशाही'त स्थान नाही! जगाला आज जेवढ्या तरुण मनुष्यबळाची (वर्क फोर्स) गरज आहे, त्यांपैकी एकअष्टमांश शक्ती एकटा भारत पुरवू शकतो! एवढी तरुणांची संख्या येथे आहे. पण त्यांचे वर्णन सावंत यांनी 'स्वतंत्र देशातील परतंत्र युवावर्ग' असे केले. ते म्हणाले, की त्यांना हक्कांची जाणीव आहे, परंतु त्यांना कर्तव्याबाबत काही सांगण्यातच आलेले नाही. त्यामुळे, सर्व काही सरकार करणार असा त्यांचा समज होऊन त्यांचे सरकारीकरण झालेले आहे.

सावंत व्यवसायानिमित्त जगभर फिरत

●●●

## खटाटोप ह्यासाठी....

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'ही वेबसाईट चालवण्यासाठी नॉन- प्रॉफिट कंपनी निर्माण केली आहे. त्या कंपनीसाठी 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' असे नाव मिळाले आहे.

'थिंक महाराष्ट्र'ही वेबसाईट गेल्या मार्चमध्ये (२०१०) औपचारिक रीत्या सुरू झाली. तेव्हापासून, ही निव्वळ वेबसाईट नव्हे तर, व्यासपीठ आहे आणि यावर समाजातील प्रज्ञा-प्रतिभेच्या व चांगुलपणाच्या गोष्टींची नोंद केली जाईल, असे आपण म्हणत आलो व तशा माहितीचे संकलन चालू ठेवले. त्यामधून पिंपरीजवळ केवळ कमळांचे उद्यान (आशियातील एकमेव?) सुरू करू पाहणाऱ्या सतीश गदियाची ओळख झाली, त्याच्याप्रमाणे जुन्या पोथ्या डिजिटाइटज करून त्यातील ज्ञानसंपदा चिरंतन संरक्षित करण्याचा प्रयत्न चालवलेल्या नाशिकच्या दिनेश वैद्यचा खटाटोपही कळला. अशी कितीतरी उदाहरणे! महाराष्ट्रातील कर्तृत्ववान व्यक्तींची नोंद आणि व्यक्तिगत व संस्थात्मक पातळीवर चालवलेल्या स्वयंसेवेचा तपशील आस्थेने टिपण्याचा प्रयत्न सुरू केला, तो समाजाची ही ताकद कळावी म्हणून. या प्रकारच्या वेगवेगळ्या मजकुरांत जे सांस्कृतिक महत्त्वाचे शब्द येतात त्या शब्दांच्या निमित्ताने त्यांची माहिती अधोरेखित करण्याचा प्रयत्न सांस्कृतिक नोंदी या सदरात होतो. त्यामुळे आपले संचित सतत नजरेसमोर राहील, परंतु त्यात रमण्याची वृत्ती कमी होईल.

याशिवाय प्रासंगिक, सांस्कृतिक ठेवा व घटना अशा सदरांमधूनही संस्कृतिसंचित नोंदले जाते. तर वादचर्चा, अवांतर, बृहत्कथा व मूल्यविवेकसारखे नियमित लेखन यांमधून बौद्धिकतेला स्फुरण मिळेल असा



कमळवेडा सतीश गदिया

विचार असतो. समाजाची कामगिरी सर्वसामान्य माणसाच्या कर्तबगारीने, त्याच्या ज्ञानकला वेडाने ठरते. ती महाराष्ट्रात गेल्या पन्नास वर्षांत शून्यवत भासते. खरेतर बुद्धिमत्ता, प्रबोधन हे या समाजाचे भूषण होते. फुले--टिळक-आगरकर-आंबेडकर अशी पंचवीस तरी राष्ट्रपातळीवरील माणसे १९५० पर्यंतच्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेली. आज २४ बाय ७ चॅनेलवरच्या चर्चेत सहज भाग घेऊ शकणारा एक 'स्मार्ट' माणूसदेखील मराठीत सांगता येत नाही. बौद्धिकता तर विद्यापीठांतील विशेष अभ्यासात अडकून पडली आहे. समाजाला तिचा उपयोग नाही. स्वयंप्रज्ञ, उपक्रमशील, स्वतंत्र बुद्धिविचार असलेल्या मंडळींचा शोध हे 'थिंक महाराष्ट्र'च्या माध्यमातून करायचे काम आहे. अशा कामाला चालना द्यायची आहे.

वेबसाईटचे असे विविधांगी रूप ठेवताना त्यामधून 'थिंक महाराष्ट्र लिंक महाराष्ट्र' हे जे आपले प्रमुख सूत्र आहे ते कसे साध्य होईल ही दृष्टी ठेवली जाते. महाराष्ट्रातील समाजाचे खरे दुखणे हे आहे, की या समाजात कर्तृत्वास व चांगुलपणास संधी राहिलेली नाही. हे दोन्ही गुण जोपासले जातील अशी व्यवस्था येथे नाही आणि त्यामुळे हा समाज न्यूनगंडाने ग्रासला गेला आहे. या व्यथेस तोंड फोडावे आणि समाजात पुन्हा चैतन्य यावे यासाठी 'थिंक महाराष्ट्र..' या वेबसाईटचा खटाटोप आरंभला आहे. सर्व वाचकांना निधी संकलन, ध्येयधोरणाची आखणी आणि वेबसाईट चालवणे व कंपनीचे अन्य उपक्रम यांमध्ये सहभागी होता येईल. त्यासाठी अर्थातच पद्धत असेल. अशा तऱ्हेने वाचकांचा जबाबदारीचा सहभाग आम्हांस हवा आहे. लेख आणि नियमित सादर होणारी 'ग्रंथोपजीविये' ही पुस्तक आणि नियतकालिकांतील लेखसूची हे 'थिंक महाराष्ट्र' वेबसाईटचे वैशिष्ट्य ठरू शकेल. वेगवेगळ्या तऱ्हेची माहिती संकलित करून वेबसाईटच्या कामात सहभागी होण्याची इच्छा असलेल्या वाचकांनी जरूर संपर्क साधावा.

असतात व त्यांच्या बोलण्यात तसे संदर्भ वारंवार येत. त्यामधून जागतिक चित्र तयार होण्यास मदत होई. त्यांनी चीनचा वसाहतवाद कसा वाढत आहे याचे काही दाखले दिले.

त्यांनी तरुणपणाची लक्षणे नेमकी वर्णन केली. ते म्हणाले, की मुलगा/मुलगी तरुण होतात तेव्हा त्यांचे परावलंबीत्व संपते, अज्ञानाकडून ज्ञानाकडे प्रवास सुरू होतो, त्यांच्या स्वतःच्या 'सेक्स'पलीकडच्या दुसऱ्या सेक्सचे (हेट्रोसेक्शुॲलिटी) भान येते आणि याच काळात, त्यांना 'स्व'पलीकडची इतरेजनांच्या, समाजाच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे गरजेचे आहे.

त्यांनी समाजासाठी, तरुण कार्यकर्ते घडवण्यासाठी 'व्हास्ट'(व्हर्च्युअल ॲकेडमी फॉर सोशल ट्रान्सफॉर्मेशन) नावाचा कार्यक्रमदेखील मांडला. त्यातून लाखो 'नॅनो' कार्यकर्ते तयार केले जाऊ शकतील व सगळ्या महाराष्ट्रभर चैतन्याचे वातावरण पसरेल असा त्यांचा विश्वास आहे. 'उद्याचे नेतृत्व घडवण्यासाठी विचार' हे जे सूत्र अभय बंग यांनी आरंभी मांडले होते ते विवेक सावंत यांच्या निवेदनात ठासून पुढे आले.

विवेक सावंत म्हणाले, की 'व्हास्ट'तर्फे नव्या महाराष्ट्राचे चित्र प्रथम रेखाटण्यात येईल. त्यांना अभिप्रेत होते ते 'व्हिजन डॉक्युमेंट'. ॲकेडमीचे काम करत असताना काही पथ्ये पाळावी लागतील असे त्यांनी सुचवले. हिंसाचार व राडा संस्कृती यांचा धिक्कार आणि सहिष्णुता व प्रेमभाव यांचा स्वीकार हे त्यांतील महत्त्वाचे. त्याहून महत्त्वाची आहे ती सावंत यांची त्यामागील धारणा. ते म्हणाले, की सहिष्णुता व प्रेमभाव हा भारताचा आत्मा आहे. आधुनिक जगात जेव्हा चीनच्या पराभवाची वेळ येईल तेव्हा जग आपल्या या गुणविशेषांमुळे भारताकडे आशेने पाहत असेल!

विवेक कुळकर्णी यांनी, नव्या जगात विकास हेच ध्येयधोरण मानले, तर ते तरुणांचे आकर्षण ठरेल असे सुचवले तर 'युनिक फीचर्स'चे आनंद अवधानी यांनी 'कॉर्पोरेट कल्चर'कडे जुन्या विरक्तीने पाहणे सोडावे व ती संस्कृती स्वीकारावी असे म्हटले.

महाराष्ट्रात एकेकाळी राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, राष्ट्र सेवा दल, सानेगुरुजी कथामाला, बाबा आमटे यांची श्रमसंस्कार छावणी यांसारख्या राज्यव्यापी, तरुणांना 'घडवणाऱ्या' संस्था होत्या. त्यांचा प्रभाव जवळजवळ संपला आहे. अभय बंग यांचा मुलगा अमृत हा 'निर्माण' संस्थेच्या माध्यमातून काही प्रयोग गेली चार वर्षे करत आहे. प्रकाश आमटे यांचा मुलगा अनिकेत हेमलकसा येथे दर मे महिन्यात श्रमसंस्कार छावणी भरवत असतो. अमरावतीचे अविनाश सावजी यांनी तरुणांसमोर 'रोल मॉडेल' उभे करण्यासाठी शिबिरे घेण्याचा तडाखाच लावला आहे. परभणीच्या 'स्वप्नभूमी'चे सूर्यकांत कुळकर्णी यांची तरुणांना सामाजिक भान देण्याची 'स्वदेश' योजना बासनात आहे. त्यांच्याबरोबर फिरोदिया, गोवारीकर अशा 'सेलिब्रिटी' आहेत. नव्या युगासाठी नवा विचार गाठण्याचे हे प्रयोग आहेत. त्यांमध्ये एकसूत्रता नाही. शिवाय, त्यांना प्रेरकता लाभत नाही याचे कारण विचारांचा अभाव. अभय बंग, विवेक सावंत व अनिल शिदोरे यांचा रोख तेथे दिसतो. ते 'विचारदिशे'च्या शोधात आहेत.

विचार 'आर्टिक्युलेट' करण्यात अभय बंग कुशल आहेत. त्यात त्यांची गांधीविचारांवर मूलश्रद्धा असल्याने त्यांना सूत्रबद्धता झकास जमते. दोन दिवसांच्या विचारमंथनाला टोक आणताना, त्यांनी राजकारण व समाजकारण कसे बाद होत गेले आहे याचे विवेचन केले आणि संस्कृतिकारणाचा पर्याय प्रतिपादन केला. तीच ती लेखारंभी नमूद केलेली सूत्रवाक्ये. त्या संदर्भात, भारतीय संस्कृतीमधील पर्यावरण व आध्यात्मिकता हे मुद्दे कळीचे होतील असे त्यांनी सांगितले. त्यांनी त्यांचा मुलगा अमृत बंग याच्या नेतृत्वाखाली 'निर्माण' या युवा कार्यकर्ते घडवण्यासाठी गेली चार वर्षे चालू असलेल्या प्रयोगाचा उल्लेख केला व ते म्हणाले, की तीस उच्चशिक्षित तरुण तरी समाजकार्याकडे प्रवृत्त झाले आहेत.

बंग यांनी सांस्कृतिक प्रभाव कसा महत्त्वाचा ठरत आहे हे सांगताना म्हटले, की संस्कृती ही व्यक्तिगत गोष्ट आहे. विद्यमान सांस्कृतिक जीवन जाणायचे तर ते व्यक्तिगत आवडीनिवडीमधूनच स्पष्ट होईल. त्यातूनच आजचे मुद्दे कळून येतील. आजच्या काळात व्यक्तिवाद जोपासला गेला असल्याने व्यक्तिवैशिष्ट्ये महत्त्वाची ठरतात. प्रत्येक माणूस रोजचे जीवन कसे जगत आहे? काय खात आहे-पीत आहे? काय पोषाख करत आहे? गाडी कोणती वापरत आहे? व कोणती नाकारत आहे? हीच त्याची राजनैतिक भूमिका आहे हे समजले पाहिजे. असे जेव्हा बंग यांनी म्हटले तेव्हा डुंबरे स्वाभाविकपणे उद्गारले, आम्हालाही 'पर्सनल इज पॉलिटकल' असंच सांगितलं गेलं होतं. त्याचा आजच्या काळात असा अन्वयार्थ आहे.

अभय बंग यांनी त्यांच्या निवेदनात गांधीजींच्या 'हिंदस्वराज' या पुस्तकाचा वारंवार उल्लेख केला. बंग म्हणाले, की 'हिंद स्वराज' या पुस्तकाने माझ्यासमोर अनेक कोडी उभी केली. ती मी सतत सोडवत असतो आणि त्याकरता त्या पुस्तकाकडे परत परत वळत असतो.

बंग यांच्या निवेदनामधून पुढील काळातील त्यांच्या विचाराची दिशा स्पष्ट होत होती. सध्याच्या ज्येष्ठ पिढीने तरुण पिढीसाठी साधावयाच्या गोष्टी हा त्यांचा यापुढील ध्यास असणार आहे, हे स्पष्ट झाले. दोन दिवसांचे विचारमंथन सर्वांनाच उपयोगी वाटले. त्यामुळे विवेक सावंत व अनिल शिदोरे या दोघा संयोजकांनी तिथेच जाहीर केले, की असे शिबीर यापुढे तीन वर्षे तरी दरसाल भरवले जाईल!

thinkm2010@gmail.com
द्वारा **दिनकर गांगल**
ए/३, अजिंक्यतारा सोसायटी,
स्वस्तिक पार्क, चेंबूर, मुंबई-४०० ०७१

# ग़ज़लचे सौंदर्य – चिंतन

डॉ. राम पंडित

''....भट यांच्यानंतर तुमच्याच ग़ज़ला मला जास्त आवडतात... विशेषत: अलीकडच्या ग़ज़लांच्या बाजारगर्दीत तुम्ही तिच्यातले काव्य उंच स्तरावर नेऊन ठेवले आहे.''

हे मत सूज्ञ संपादक व कवी पुरुषोत्तम पाटील यांचे, सदानंद डबीर यांच्या ग़ज़लांच्या संदर्भातले आहे. डबीर हे कवी, गीतकार व ग़ज़लकार या तिन्ही संबोधनाने ख्यातीप्राप्त आहेत. नुकताच त्यांचा 'गारूड गझल'चे हा ग़ज़लविषयक १७ लेखांचा संग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे त्यामुळे ते ग़ज़लचे आस्वादक-विश्लेषक म्हणूनही ओळखले जातील.

या संग्रहातील 'ग़ज़लियत' या पहिल्या लेखातच डबीरांनी आपली 'लेखकीय भूमिका ग़ज़ल जाणकाराची नाही, आपण कुणासही ग़ज़ल शिकवू इच्छित नाही किंवा आपल्याला ग़ज़ल 'वश' झाली आहे असेही मुळीच म्हणायचे नाही', हे विनम्रपणे नमूद केले आहे. मात्र संपूर्ण लेख वाचल्यावर हे ग़ज़लचे सौंदर्यचिंतन आहे असे मला जाणवले.

सदानंद डबीरांनी या लेखांत अनेक मूलभूत प्रश्नांचा ऊहापोह केला आहे. उदाहरणार्थ 'उर्दू ग़ज़ल ऐकताना जी मजा येते ती मराठी ग़ज़ल ऐकताना येत नाही. मराठी भाषिकदेखील उर्दू ग़ज़लला 'वाह क्या बात है' अशी दाद देतो, पण मराठी ग़ज़लला तशी दाद येत नाही.' डबीरांचे हे म्हणणे सत्य आहे. त्यासाठी त्यांनी उर्दू शेरांची काव्यात्मक संवेदनक्षमता उदाहरणांसह अधोरेखित केली आहे. 'ग़ज़लियत' ही साऱ्याच भाषांत विवादास्पद संकल्पना आहे. प्रत्येकाची आपापली व्याख्या आहे. ऐकून अथवा वाचून जे शेर बुद्धी व मनाचा ठाव घेतात, अंत:करणात रुजून कंठस्थ होतात, बुद्धीला विचारप्रवृत्त करतात ते शेर त्यांच्यातील ग़ज़लियतमुळे. कधी त्यांच्यातील विरोधाभास-विसंगती भावते तर कधी त्यातील भावनात्मक वृत्ती मोहक वाटते. कधी शेरांची आत्मसंवेदनशीलता प्रेमात पाडते तर कधी अनुभवाधिष्ठित विचाराने श्रोता/वाचक प्रभावित होतो. काफिया, अंत्ययमक (End Rhyme) व छंदात्मक संरचनेचेही योगदान 'ग़ज़लियत'मध्ये महत्त्वपूर्ण असतेच. ह्या सर्व बाबी डबीरांनी आधुनिक उर्दू ग़ज़लकार नासिर काज्मी, कतील शिफाई, मख्मूर सईदी, निदा फाजली, कुमार पाशी, महंमद अलवी व शहरयार यांच्यावरील लेखांद्वारे स्पष्ट केल्या आहेत. मात्र 'मराठी ग़ज़लमधून 'काहीतरी' निसटून जातेय ते काय?' या समष्टी प्रश्नाचे उत्तर ग़ज़लकारांनीच आत्मचिंतन करून सोडवायचे आहे. माझ्या मते, उर्दू शब्दसंपदा मूलत: काव्यात्मक असून बहुतांश शब्द बहुअर्थच्छटांचे आहेत. त्यामुळे त्यांचे आकलन रसिकपरत्वे भिन्न-भिन्न आहे. शिवाय एका शब्दाला अनेक पर्यायी शब्द त्या भाषेत आहेत (कारण उर्दूने अनेक भाषांतून शब्द ग्रहण केले आहेत.) आता उर्दू शेर फक्त पॅरॉडॉक्सीवर आधारित असतात असे नाही. पण सूत्रबद्ध काव्याची आकर्षक अभिव्यक्ती व शैली त्या भाषेतील ग़ज़लेने अवगत केली आहे. उर्दूनिष्ठ दुष्यंतकुमारची हिन्दी ग़ज़ल संस्कृतनिष्ठ हिन्दी ग़ज़लांहून अधिक लोकप्रिय ठरली ती याच कारणांमुळे.

सुरेश भटांनी मराठी ग़ज़लेत 'मी'चा जो अत्याधिक वापर रुजविला, तो त्यांच्या ग़ज़लेत शोभला कारण त्यांच्यातल्या महान कवीला व्यष्टीचा तो 'मी' समष्टीकडे नेता आला. त्या 'मी'चे व्यक्तिगत सुखदु:ख, आशानिराशा, चिंता, समस्या सहजगत्या विश्वव्यापक होताना जाणवतात. परंतु उत्तरोत्तर इतरांच्या ग़ज़लेत हा 'मी' व्यापक न होता मर्यादित होताना दिसतो व त्याचमुळे खटकतोदेखील (अपवाद मीसुद्धा नाही.) सर्व ग़ज़लकारांसमोर रोल मॉडेल सुरेश भटच असल्याने त्यांची अनुकृती स्वाभाविकच होती. त्यामुळे डबीरांच्या मते मराठी ग़ज़लचा तोंडवळा एकसारखा झाला व ग़ज़ल एकसुरी झाली. समानानुभूती नसताना भटांच्याच विषयांचे मराठी ग़ज़लेत अनुकरण होत गेले हे सत्य नाकारता येणार नाही.

मराठी ग़ज़लेत निसर्ग आला, अध्यात्म आले तर अन्य ग़ज़लकार त्या रचनेस ग़ज़ल मानीत नाहीत हा डबीरांचा आक्षेप बरोबर आहे. खरे तर, ग़ज़लेला विषयाचे बंधन नाही. अध्यात्मपर ग़ज़लेस उर्दूत 'हम्दीया ग़ज़ल' म्हणतात. सूफी रंगात तर असगर गोंडवी, जिगर मुरादाबादींच्या अनेक ग़ज़ला आढळतात. एवढेच नव्हे तर ग़ज़ल कधी गीताच्या अंगाने जाते (इब्ने इंशा, निगार सहबाई) तर कधी कवितेच्या अंगाने (राजेन्द्र मनचंदा बानी, शीन काफ निजाम, कुमार पाशी, महंमद अलवी) जाते. इथे डबीरांनी अलवी, पाशी यांचे अनेक शेर या संदर्भात उद्धृत केले आहेत. कविता व गीताहून ग़ज़लची पृथकता बाह्य संरचनेमुळेच आहे (रदीफ, काफिया, मतला, मकता, बहर इत्यादी). आंतरसंरचनेच्या दृष्टीने तिच्या प्रत्येक शेरात एक परिपूर्ण कविता विद्यमान असतेच. हे शृंखला-काव्य या सदरातच मोडेल. पण प्रत्येक शेराची जादूगिरी भिन्न अनुभूती देत असूनही बहर, रदीफ - काफियांच्या लयात्मकतेमुळे एका शेरातून दुसऱ्या शेराच्या विषयात प्रवेश करताना रसोभंग प्रत्ययास येत नाही.

'ग़ज़लचे रंग-अंतरंग' या महत्त्वपूर्ण लेखात डबीरांनी ग़ज़लच्या बाह्य संरचनेचा परिचय करून दिला आहे. हा लेख नवोदित ग़ज़लकारांसाठी उपयुक्त आहेच, शिवाय ज्येष्ठांनीदेखील अवलोकन करावा असा आहे. कारण लता मंगेशकरांच्या एका वक्तव्याच्या आधारे डबीरांनी 'ग़ज़लचाही प्रत्येक शेर हा बेमालूमपणे असा बांधलेला असावा की तो बांधला आहे हे कुणाच्या ध्यानात येऊ नये' असे मत मांडले आहे. डबीरांच्या मताशी मी सहमत आहे. कारण ग़ज़ल ही काव्यविधा तंत्रानुगामी आहे. विशेषत: मतला जरी (किंवा ग़ज़लचे एक-दोन शेर) उत्स्फूर्तपणे साकारला असला तरी कवीला ग़ज़लचे निकष पूर्ण करायला काफियाच्या अनुषंगाने काही शेर रचावे लागतात. ही कृत्रिमता 'आबुर्द' म्हणून संबोधली जाते व उत्स्फूर्ततेला 'आमद' असे म्हणतात. तेव्हा 'आबूर्द'च्या कारागिरीतील सूक्ष्मता जाणवता कामा नये ते शेरदेखील 'आमद'चेच वाटावे असे नैपुण्य ग़ज़लकार कवीत असावे. यमक-विन्यासामुळे शेरांचे स्वरनियमन होतेच पण काफियाच्या वापरासाठी शेर लिहिण्यात आलाय असं जाणवता कामा नये.

डबीरांनी निदा फाजली फैज व अहमद फैज या दोन उर्दू शायरांचे वक्तव्य नमूद केले आहे ते मराठी ग़ज़लकारांनी लक्षात घेण्याजोगे आहे. निदांच्या मते, 'चांगला शेर लिहिणे तितकेसे कठीण नाही. स्वत:चा शेर (म्हणजे ज्या शेराद्वारे आपली ओळख स्थापित होईल) लिहिणे कठीण आहे.' फैज यांच्या मते, 'अकारण शेर लिहिणे ही बाब तितकीशी शहाणपणाची म्हणता येणार नाही.' म्हणजेच कृत्रिमतेने ग़ज़ल सृजन होऊ नये हीच चांगल्या ग़ज़लची गरज आहे.

सदानंद डबीरांचा आणखी महत्त्वाचा लेख म्हणजे 'मराठी ग़ज़ल मेकॅनिकल होत आहे का?' यात ते ग़ज़ल आवडण्याचे निकष कोणते, असा प्रश्न उपस्थित करतात. याबाबत असे म्हणता येईल, की शेरांतील विचार, कल्पना, शब्दांचा खेळ, अनुप्रास, लय-नाद हे तंत्रापेक्षा वरचढ ठरतात. तंत्रशुद्धता केवळ रचनासौष्ठव देते. खरे आहे, काव्यानुभूती तंत्राने येत नाही. त्याने फार तर नादमाधुर्य जाणवते. लयनिष्ठता प्रत्ययास येते. पण रसानुभव येत नाही. तंत्र, छंदोबद्ध काव्याचा आकृतिबंध निर्दोष करते पण त्यातील विचार, कल्पना-भाव इत्यादी गोष्टीच रसिकांना अधिक प्रभावित करतात. मात्र डबीर म्हणतात त्याप्रमाणे लाल पेन हाती घेऊन वाचणाऱ्या मंडळींना समर्थांच्या किंवा तुकोबारायांच्याही काव्यात दोष आढळतील. ही मंडळी मूलत: कवी नसतात तर कार्यशाळेनिर्मित ग़ज़लकार असतात. अशांची दखल खऱ्या ग़ज़लकराने न घेता, त्यांच्या समीक्षेकडे दुर्लक्ष करीत उपेक्षा करणे उचित. पण मग प्रश्न पडतो, खरे काव्यसमीक्षक मराठी ग़ज़लची समीक्षा का करीत नाहीत? डबीर म्हणतात,'त्यांना मराठी ग़ज़ल फारशी दखलपात्र वाटत नाही किंवा ती मेकॅनिकल वाटत असावी म्हणून ते मौन बाळगून असावेत.'

बहुतांश मराठी ग़ज़ल मेकॅनिकल आहे हेच खरे. कारण कार्यशाळेमुळे अ-कवीदेखील ग़ज़ल लिहीत आहेत एवढेच नव्हे तर आपल्या पहिल्याच ग़ज़लसंग्रहात (भटांप्रमाणे वीस वर्षे वाट न बघता) नवोदितांसाठी ग़ज़लची (भटांच्या चालीवर) बाराखडीदेखील देण्याचे धाडस करतात. ग़ज़लचे तंत्र तसे खरेच सोपे आहे, मात्र ग़ज़लचा मंत्र अवघड आहे. त्यामुळे बाह्यांगाने ग़ज़ल भासणाऱ्या रचनेच्या अंतरंगात ग़ज़लियतचा अभाव अधिक जाणवतो. काही शेर लयबद्ध तर असतात पण आशयविहीन असतात, मात्र ते लोकप्रिय गवय्यांनी गायल्यामुळे सर्वतोमुखीदेखील होतात.

डबीर म्हणतात, 'तंत्र शिकवण्यात काही गैरे नसेलही, पण तंत्र निर्दोषपणे सांभाळले की ग़ज़ल झाली असा गैरसमज झाला व तुरळक अपवाद वगळता ग़ज़लच्या कार्यशाळेतून चांगले ग़ज़लकार निर्माण झाले नाहीत.

कार्यशाळा हा सामुदायिक क्लासेसचा प्रकार होय. ग़ज़लक्षेत्रात उस्ताद व इस्लाह (परिष्करण पद्धती) परंपरा आहे ती मुख्यत: तंत्रासाठीच, उस्ताद म्हणजे ग़ज़लगुरू नवोदित कवीला तंत्र शिकवतो व त्याच्या ग़ज़लेत तांत्रिक व कधीकधी आशयअभिव्यक्तीबाबतही परिष्करण करून देतो. इथे तो शिष्य ग़ज़लकार बनण्यास उचित आहे अथवा नाही हे पारखून घेतल्यावरच त्यास शिष्यत्व बहाल करतो. कार्यशाळेचे तसे नाही. प्रवेशमूल्य भरल्यावर त्वरित प्रवेश मिळतो. पात्र-अपात्रतेचा प्रश्नच नसतो. मराठीत ही उस्ताद परंपरा फोफावली. ज्यांच्या ग़ज़लांनाच परिष्करणाची गरज आहे असे ग़ज़लकार स्वयंघोषित उस्ताद बनले. अल्पावधीत त्यांच्या शिष्याचे शिष्यदेखील उस्ताद पदवीस प्राप्त झाले. अशांच्या रचनांतून काव्यमूल्य, विचारमूल्य बाद झाले. अनेक उस्तादांच्या शेरांत उर्दू शेरांचा भावानुवाद दृष्टीस पडू लागलाय. काहींच्या शेरांत प्रचारकी प्रतिशोधात्मक कर्णकटुता दिसून येत आहे, तर काहींचे शेर अहंकेंद्री वाटतात.

अन्य आदर्श नसल्याने भटांचे अनुकरण करीत मराठी ग़ज़लचा प्रवास मेकॅनिकल झालाय असे डबीरांना वाटते, पण सानेकर, इलाही, स्वत: डबीर व सात-आठ ग़ज़लकारांची ग़ज़ल आपली नवी वाट चोखाळत आहे हेही सत्य आहे.

सुरेश भटांनी आपल्या पस्तीस वर्षांच्या काव्यसृजन कालावधीत अडीचशेच्या जवळपास ग़ज़ला लिहिल्या. गालिबचेही 'दीवान' अडीचशे ग़ज़लांच्याच आसपास आहे. ग़ज़लमध्ये एकटाकी लिखाण क्वचित संभवते. भट तर काही ग़ज़ला पूर्ण करण्यासाठी महिने-वर्ष घेत असत. यामुळेच भटांच्या ग़ज़ला अभिजात झाल्या आहेत. त्या उत्स्फूर्तपणे साकारल्या आहेत असेच जाणवते. अलीकडे ग़ज़लचे काही आशुकवी वर्षाला शंभर-शंभर ग़ज़ला पाडतात हे पाहून मराठी ग़ज़लच्या निकोप वाढीबद्दल व भवितव्याबद्दल चिंताजनक परिस्थिती होईल असेच म्हणता येईल.

बहुप्रसव साहित्य सृजनस्तरीय असण्याची शक्यता अंधुक असते असे शेर, फैज म्हणतात त्याप्रमाणे, अकारण लिहिलेले शेर असतात. त्यांस 'तुकबंदी' असे नाव आहे. अशा शेरांनी ग़ज़लकाराची ओळख स्थापित होणे सर्वथा अशक्य असते. अशा सृजनामागे ग़ज़लकाराची भीती कार्यरत असावी असे मला वाटते. ती भीती म्हणजे, 'मी सतत लिहिले नाही तर लोक, रसिकवर्ग मला विसरून न जावो,' 'आपल्या लोकप्रियतेला ओहोटी न लागो,' 'सतत लिहीत राहिलो तरच आपली दखल घेतली जाईल' इत्यादी अर्थात अशा बहुप्रसवांचाही एक चाहतावर्ग असतो, जो त्यांना येता-जाता नवीन ग़ज़ला ऐकवा अशी मागणी करीत असतो अन् ह्या प्रोत्साहनाने हुरळून जाऊन हा ग़ज़लकारही काफियांची जंत्री घेऊन चाहत्यांची इच्छापूर्ती करीत असतो. असे चाहते त्याची सृजनक्षमता दुबळी करीत असतात, हे त्याच्या गावीही नसते.

मराठी ग़ज़लचे वय पन्नास वर्षांचे आहे. उर्दू-फारसी ग़ज़लच्या तुलनेने हा अत्यंत अल्प कालावधी आहे. उर्दू ग़ज़लला विविक्षित विषयपरिघातून बाहेर पडण्यास बराच काळ लागला. स्वातंत्र्यपूर्वकाळाच्या उत्तरार्धात तिच्यात सामाजिक भान अवतरले. त्या मानाने मराठी ग़ज़लने हा टप्पा पहिल्याच दशकात गाठला. मराठी ग़ज़ल समग्र विषयांसह समर्थपणे साकारते आहे. डबीरांना व मलादेखील तिची बलस्थाने जाणवतात. त्यामुळे या ग्रंथात मराठी ग़ज़लवर टीकेचा सूर नाही, फक्त ती ज्या आवर्तनात सापडून एकसुरी होऊ पाहतेय त्याकडे ग़ज़लकार व रसिकांचे लक्ष वेधावे हाच डबीरांचा स्तुत्य हेतू दिसून येतो.

मराठीतील मान्यवर नवोदित कवींनी ग़ज़लचे तंत्र जाणून घेऊन मराठी ग़ज़ल लिहून पाहावी. मूलत: ते कवी असल्याने तंत्र जाणल्यावर ग़ज़लसृजन त्यांना फारसे कठीण जाणार नाही ह्याची मला खात्री आहे.

'मराठी ग़ज़ल ही मराठीसारखीच वाटायला हवी.' हे डबीरांचे म्हणणे कुणासही मान्य होण्यासारखे आहे. तिच्यात रूढ झालेले शब्द अवश्य यावेत, मात्र अर्थबोध न होणारे शब्द नसावेत. ग़ज़लचा आकृतिबंध उर्दूतून आपण घेतोय, तरी भाषा व संस्कृती मराठीच असावी, ही अपेक्षा रास्त आहे.

भटांनी 'ग़ज़ल'ऐवजी गझल हा शब्द वापरला व बहुतांश ग़ज़लकार हाच शब्द वापरतात. 'गझल' हा उच्चार चूक आहे. त्या मानाने निदान माधव ज्यूलियनरचित 'गज्जल' हा शब्द मूळ उच्चाराजवळतरी जातो. ग़ज़ल हा शब्द गैन, जाल, लाम या उर्दू मूळाक्षरांपासून बनतो. उर्दूची जुळी बहीण हिन्दीतदेखील 'ग़ज़ल' असे लिहिले जाते. मराठी व हिन्दीची लिपी एक असल्याने मराठीतही हिन्दीप्रमाणे ग़ज़ल लिहिले जावे. 'झ' उच्चार उर्दूत नाहीच. लिहावयाचे झाले तर 'जीम' व 'हे' अशी जोडाक्षरे वापरावी लागतील. अत्याधिक अचूक उच्चारण 'ग़ज़ल' या शब्दाने आपल्या भाषेत सहज संभव असल्याने, अट्टहासाने पाडगावकर व भट ह्या दोन्ही दिग्गजांचे केवळ एकमत (चुकीचे का होईना) आहे म्हणून 'गझल' हा शब्द, अचूकतेबाबत काटेकोर असलेले डबीर का वापरतात हे अनाकलनीय आहे.

ग़ज़लचा प्रकृतिधर्म शृंगारवादी, पलायनवादी, आत्मकेंद्री, अस्तित्ववादी, प्रारब्धवादी, नकारात्मक, चिंतनात्मक असा विविधरंगी असतो. तिच्यात महाकाव्याचे संकेत आढळत नसले तरी सूत्रांची सखोलता असते. अनेकदा तिच्यातील कालविपर्यास-देखील (इतुकेच मला जाताना सरणावर कळले होते) लक्षणीयही वाटतो. क्वचितच ती जीवनोत्साहपर सकारात्मक भूमिका घेते. तिची हीच प्रकृती रसिकांना भावते. ग़ज़लेची मूल्यमापनात्मक समीक्षा करणे कठीणच आहे. अचूक शब्दांद्वारे तिचे सौंदर्य विशद करणेदेखील कठीण आहे. डबीरांनी उर्दू-मराठी ग़ज़ला वाचल्या. आत्मपरीक्षण, मनन, विश्लेषण करीत करीत हे चिंतनात्मक लेख साकार केले आहेत. ग़ज़लचे आंतरिक सौंदर्य एक ग़ज़लकार जेवढ्या प्रकर्षाने अनुभवेल व जेवढ्या तन्मयतेने अभ्यासून शब्दबद्ध करू शकेल तेवढ्या प्रभावीपणे काव्यसमीक्षक व्यक्त करू शकणार नाही.

डबीरांच्या तटस्थ सौंदर्यचिंतनशील वृत्तीमुळे हे सारे लेख लक्षणीय झाले आहेत. 'ग़ज़लचं गारूड' उलगडण्यास याने सर्वार्थाने मदत होते. ग़ज़लवरील काही पुस्तके एवढ्यात वाचण्यात आली. त्यात बहुतांश लेखकांनी उदाहरणादाखल स्वत:चेच शेर/ग़ज़ला नको तितक्या प्रमाणात नमूद करण्याचा अट्टहास दिसून आला. डबीरांनी हा मोह ९५ टक्के टाळलाय ही स्पृहणीय बाब होय. साऱ्या लेखात डबीरांच्या व्यासंगपूर्ण लेखणीची प्रचिती येते, पण पांडित्यप्रदर्शनाचा आभासही होत नाही. ग़ज़लकार व ग़ज़लरसिक यांना हे लेख सारखेच उपयुक्त आहेत एवढेच सांगणे पुरे.

सदानंद डबीरांच्या या लेखसंग्रहावर ज्येष्ठ कवयित्री उषा मेहता म्हणतात, 'मराठी ग़ज़लच्या संदर्भात, समकालीन उर्दू ग़ज़लांचा तुलनात्मक सौंदर्यवेध घेतला आहे सिद्धहस्त मराठी ग़ज़लकार सदानंद डबीर यांनी.'

हे पुस्तक डबीरांनी मराठी व उर्दू ग़ज़लचे चाहते आणि जाणकार रसिक स्नेही उदयदादा लाड यांना स्नेहादरपूर्वक समर्पित केले आहे. ते योग्यच आहे. उदयदादांनी संगीतकार, प्रकाशक या नात्याने मराठी ग़ज़लला मौनपणे लक्षणीय योगदान दिलेय.

'ग्रंथाली'च्या या आशयसंपन्न पुस्तकाचे आवरण सुप्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांचे असून त्यांनी ते अर्थपूर्ण प्रतीकाने साकारले आहे. आतील लेख वाचल्यावर मुखपृष्ठाची अर्थवत्ता अधिक स्पष्ट होते.

**राम पंडित**
४, ॲटलांटा, प्लॉट नं. २९,
सेक्टर - ४०, नेरुळ (प.),
नवी मुंबई -४००७०६
फोन : ०२२ - २७७२३७५६

# सुरेश वाघे यांचा **'संकल्पनाकोश'**

## जयवंत वसंत चुनेकर

'वाचक चळवळ' ही नाममुद्रा असलेल्या 'ग्रंथाली'ने 'ज्ञानकोश' वर्गातला एक कोश प्रकाशित केला आहे. 'संकल्पनाकोश'. कोशकार आहेत सुरेश पांडुरंग वाघे. मराठी भाषेच्या कोशसंपदेत या कोशामुळे एका वैशिष्ट्यपूर्ण कोशग्रंथाची भर पडणार आहे.

असे विशेष या कोशात आहे तरी काय?

साधा 'ढग' हा शब्द घ्या. याला समानार्थी जलद, मेघ, पयोद असे शब्द कदाचित तुम्हाला आठवतील. पण आणखी असे शब्द किती असतील असे तुम्हाला वाटते? तब्बल १०३!

ढगांचे प्रकार किती आहेत, ठाऊक आहे? हा कोश तुम्हाला ते सांगेल.


पर्वताचा 'कडा' तुम्हा-आम्हाला माहीत असतो; 'खिंड' माहिती असते. पण खोंडा? पाज? भोय? शहाड? पर्वताशी निगडीत ह्या संकल्पनांचा नेमका अर्थ ठाऊक आहे? तो जाणून घेण्याची जिज्ञासा असेल तर वाघे यांचा हा 'संकल्पनाकोश' तुमच्या मदतीला येईल.

ग्राशेर बम, साल्टारो कांग्री, राकापोशी ही पर्वतशिखरांची नावे विदेशी वाटतात? पण ती हिमालयाची भारतीय शिखरे आहेत ही माहिती या कोशात मिळेल.

पावसाची प्राचीन मापे हा कोश आपल्याला सांगेल.

अगदी पहिल्या महायुद्धापर्यंत म्हणजे १९१४ पर्यंत एक तोळा सोन्याचा भाव पंधरा रुपये होता आणि शुद्ध सोन्याला 'पंधरे' (म्हणजे १५ रु. तोळा किमतीत उत्तम सोने) अशी संज्ञा होती ही माहिती उद्बोधक आहे ना! रुपयादेखील अस्सल चांदीचा व एक तोळा वजनाचा होता!

आठ दिशांनी वाहणाऱ्या वाऱ्यांनाही नावे आहेत, हे आपल्यापैकी कित्येकांना माहीत असणार नाही. आठ दिशांना दिक्पाल असतात; दिग्गज असतात, मग वाऱ्यांना नावे का असू नयेत या प्रश्नाने वाघे यांच्या मनात विचाराने ठाण मांडले. त्यांनी ती शोधून काढण्याचा प्रयत्न केला आणि काढली शोधून! तुमच्या माझ्यासारख्या जिज्ञासूसाठी वाघे यांनी या माहितीचा कोशात समावेश केला आहे.




अशी कितीतरी रंजक आणि ज्ञानवर्धक माहिती या कोशात तुम्हाला भरपूर मिळेल. म्हणूनच सुरुवातीला मी नमूद केले, की मराठीच्या कोशसंपदेत या कोशाने महत्त्वाची भर घातली आहे.

मराठी भाषेतील कोशवाङ्मयाचे दालन संपन्न आहे. कोशवाङ्मयाची निर्मिती ज्ञानाच्या वाढीची निदर्शक असते. ज्ञानाच्या वाढीबरोबर ते बंदिस्त करून त्याचे व्यवस्थापन करणे ही या व्यवहारातील अपरिहार्यता असते आणि कोशनिर्मितीला ही अपरिहार्यता प्रेरक ठरते. ज्ञानाच्या विकासाचे माध्यम भाषा असते हे लक्षात घेतले, तर कोणत्याही भाषेतील कोशवाङ्मयाचे महत्त्व वेगळे सांगण्याची आवश्यकता राहत नाही. कोशवाङ्मय म्हणजे पूर्वसंचिताचे संकलन करणे आणि ते पुढील पिढीपर्यंत पोचवणे यामधील सेतू असते.

भाषेच्या वाढीबरोबर शब्दसंग्रह वाढत राहतो. शब्दसंग्रहाची वाढ होऊ लागली, की शब्दांची व्यवस्था लावून अर्थ विशिष्ट, पद्धतशीर रीतीने समजावून देण्यासाठी शब्दकोश, तर ज्ञानशाखांच्या वाढीबरोबर त्यातील ज्ञानाचा संचय करण्यासाठी ज्ञानकोश निर्मितीची गरज निर्माण होते.

ज्ञानकोशाला विश्वकोशही म्हटले जाते. शब्दकोश, विश्वकोश इत्यादी कोश हे वाङ्मयाचे प्रकार असले, तरी त्या साऱ्यांचाच उद्देश जिज्ञासू वाचकाला संदर्भसाह्य पुरवणे हा असतो.

कोशाची निर्मिती वैयक्तिक पातळीवर, क्वचित संस्थात्मक पातळीवर त्याचबरोबर (आता) शासनाश्रयाच्या(ही) पातळीवर होत असते.

मराठी भाषेला वैयक्तिक पातळीवरील कोशरचनेची अभिमानास्पद परंपरा आहे. ज्ञानकोशापुरते बोलायचे तर अशा प्रयत्नांबाबत पहिला दण्डवत घालावा लागेल, तो १९२७ ते १९२९ या कालावधीत २३ खंडांचा 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' तयार करणाऱ्या डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांना.

त्याच परंपरेतला सांगता येईल असा एक कोश ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. सुरेश पांडुरंग वाघे यांचा 'संकल्पनाकोश'. गेली वीस-बावीस वर्षे वाघे यांनी केलेल्या ज्ञानसाधनेचे फलित म्हणजे हा कोश आहे.

'ज्ञानकोश' या वर्गातला. मुळात केवळ कुतुहलापोटी वाघे टिपणे काढीत गेले आणि ती काढताकाढता एकदा पीटर मार्क रॉजेचा 'इंटरनॅशनल थिसॉरस' त्यांच्या पाहण्यात आला. त्यांच्या मनातले कुतूहल, जिज्ञासा जागी झाली आणि 'संकल्पनाकोशा'चे बीज त्यांच्या मनात पडले. संकल्पना स्वरूपात रॉजेच्या कोशाच्या जवळपास जाईल असा कोश मराठी भाषेत नाही, असे वाघे यांच्या ठळकपणे लक्षात आले. त्यांनी असा कोश तयार करण्याचे आव्हान स्वीकारले आणि जमा केलेल्या माहितीच्या आधारे 'थिसॉरस'च्या धर्तीवर समानार्थी कोश तयार करण्याच्या 'उद्योगा'ला ते लागले.

पूर्वसूरींनी केलेल्या कोशांची पाहणी सुरेश वाघे यांनी केली होतीच. बाबा पदमनजी, यांच्या 'शब्दरत्नावली'ची निर्मिती म्हणजे मराठीतील थिसॉरसचा पाया. त्यानंतरही काही समानार्थी कोश अलिकडे तयार झाले आहेत. त्यातला महत्त्वाचा, मो.वि.भाटवडेकरांचा 'पर्याय शब्दकोश'. पण 'थिसॉरस'चे आधुनिक व्यापक स्वरूप लक्षात घेता हे कोश अपुरे वाटल्याने वाघे यांनी प्रस्तुत 'संकलपनाकोशा'च्या निर्मितीला हात घातला आणि अव्याहत कष्टांनंतर तो सिद्ध केला.

''या कोशाचा जो वाचकवर्ग नजरेसमोर ठेवला आहे त्याच्या विचारविश्वामध्ये केव्हा ना केव्हा प्रवेश करणाऱ्या किंवा आजुबाजूचे जग सोत्सुक, सजगपणे न्याहाळताना किंवा वाचन करताना त्याच्यासमोर येणाऱ्या, अपरिचित पण कुतूहल चाळवणाऱ्या संकल्पना येथे निवडल्या आहेत.'' अशा शब्दांत वाघे यांनी त्यांच्या या 'संकल्पनाकोशा'ची दिशा, प्रेरणा स्पष्ट केली आहे.

आपला कोश भरपूर, पण साधार माहितीने भरलेला असेल अशी काळजी वाघे यांनी घेतली असली तरी फार तांत्रिक किंवा वैज्ञानिक संकल्पनांनी कोशाला बोजडपणा, रुक्षपणा येणार नाही याचेही भान ठेवले आहे. कोशाचा विस्तार मर्यादित ठेवून संकल्पनांची निवड त्यांनी केली आहे.

वाघे यांच्या या कोशात संकल्पनांचे समानार्थी शब्द तर आहेतच; पण आनुषंगिक माहितीही विपुल आहे. ती रंजक, पण अचूक असेल याची दक्षता त्यांनी घेतली आहे. या बाबत वाघे यांची भूमिका त्यांच्याच शब्दांत लक्षात घेणे युक्त ठरेल. वाघे प्रस्तावनेत म्हणतात : ''अशा प्रकारच्या कोशात शब्दांची व्याख्या अगर आनुषंशिक माहिती देणे अपेक्षित नसते. पण प्रस्तुत 'संकल्पनाकोश' सामान्य वाचकांची जिज्ञासा भागवण्यासाठी तयार केला आहे. माझ्या कल्पनेतला वाचक शालान्त परीक्षेपर्यंत शिकलेला आहे. फार तर त्याचे शिक्षण एखाद्या पदवीपर्यंत झालेले असू शकेल. शालान्त परीक्षेनंतर ज्याचा इतिहास, भूगोल, भाषा, विज्ञान इत्यादी विषयाशी संबंध सामान्यत: राहत नाही. पण ज्याला जिज्ञासा आहे अशा वाचकासाठी थोड्या विस्तृत प्रमाणात माहिती दिली आहे. त्याला कंटाळा वाटू नये म्हणून काटेकोर शास्त्रीय परिभाषेतील; पण क्लिष्ट वाटणाऱ्या व्याख्या (उदा. सेकंद, मीटर यांच्या व्याख्या) टाळल्या आहेत. पण माहिती अचूक आणि त्याचबरोबर मनोरंजक व्हावी असा प्रयत्न केला आहे.''

कोशाची विभागणी एकूण दहा विभागांत केली आहे. कोशाचा हा पहिला खंड असून त्यात धर्म, काल, विश्व आणि प्राणी व वनस्पती या चार विभागांचा समावेश आहे.

पहिल्या 'धर्म' या विभागाचे पुन्हा 'व्यक्तिविशेष' व 'धार्मिक व पौराणिक संकल्पना' असे दोन पोट विभाग कल्पिले आहेत. 'व्यक्तिविशेष' यामध्ये ठळक देवदेवता व पौराणिक व्यक्ती यांच्यासाठीचे समानार्थी शब्द तर आहेतच, पण त्यांचे आई-वडील, पती/पत्नी, पुत्र यांची नावे व प्रकरणपरत्वे त्यांचे समानार्थी शब्द दिले आहेत. शिवाय त्याहीपुढे रंजक वाटेल अशी माहितीही वाचक म्हणून मिळत जाते. या देवतांची आयुधे, वाहने यांची समानार्थी शब्दांसहित नावे या कोशात आढळतील. उदाहरणार्थ, 'इंद्र' देवता माहिती असते पण त्याचे समानार्थी शब्द विचारले तर सांगता येणे कठीण. एकूण 'इंद्र' किती आहेत, कोणते आहेत ते सांगता येईल? इंद्राच्या तलवारीला काय नाव होतं माहीत आहे? हा संकल्पनाकोश तो तपशील पुरवील. एवढेच नाही, इंद्राचा हत्ती ऐरावत हे कुठेतरी वाचनात आलेले असेल; पण ऐरावताची 'स्त्री', त्याचा भाऊ यांची नावे सांगता येणे अवघडच. हा 'संकल्पनाकोश' ती माहिती देईल!

'अग्नि'चे समानार्थी शब्द थोडे थोडेके नाहीत, तब्बल २५६ आहेत हे हा कोश सांगेल. अग्नीला पवमान, पावक, शुचि ही तीन मुले असून या तिघांना मिळून ४५ अपत्ये होती, ही माहिती 'कल्पनेपलीकडील' या सदरातीलच ठरेल.

'ब्रह्मा'चे समानार्थी शब्द यात सापडतीलच. पण त्याचे तब्बल चाळीस प्रकार आहेत ते कोणते, हे सर्वसाधारण जिज्ञासू वाचकालाही माहीत असणार नाही. हा संकल्पनाकोश तुम्हाला ती माहिती देईल.

एखाद्या संकल्पनेची माहिती वाघे किती बारकाईने देतात याचे प्रत्यंतर घ्यायचे असेल तर कोशातल्या विभाग दोनमधील 'कालमापन' ही नोंद पाहावी. या नोंदीखाली जी माहिती कोशकाराने दिली आहे ती वाचून सर्वसाधारणच काय, जिज्ञासू वाचकदेखील अचंबित झाल्याशिवाय राहणार नाही.

'पाणी' किंवा 'नदी' या भाग तीनमधील नोंदीही मुद्दाम लक्ष वेधाव्या अशा आहेत. पाण्याचे थोडेथोडके नाहीत; तर नव्वद प्रकार वाघे यांनी नोंदले आहेत. पुन्हा त्याची प्राचीन, अर्वाचीन अशी वर्गवारीही वाघे तुम्हाला देतात. इतकेच नाही, १७० पेक्षाही अधिक अर्वाचीन पाणी -प्रकार वाघे आपल्याला सांगतात. नदीची 'छान्दोग्योपनिषदातील' व्याख्या वाघे यांनी शोधून काढली आहे. नदीची व्याख्या असल्याचे आजवर तुम्हाला ज्ञात होते? दीर्घिकेचे ('गॅलेक्सी'चे) किती प्रकार आहेत हे जाणून घ्यायचे असेल तर हा

# वृत्तीबदलाची चळवळ

## सु.गो. तपस्वी

लोकशाही ही एक प्रणाली आहे. मानवी उत्क्रांतीतून उदयास आलेल्या त्या प्रणालीला राजकारणाच्या संदर्भात अर्थ प्राप्त होतो तो लिखित वा प्रमाण मानत आलेल्या संविधानातून. 'लोकशाही मूल्ये' ह्या विषयावर विचार करताना व्यवस्था व प्रत्यक्ष व्यवहार ह्यांतील अंतर मात्र लक्षात घेतलं पाहिजे.

'व्यक्तिस्वातंत्र्य' हे लोकशाही मूल्य आहे का? वरवर तसं वाटतं; तो गैरसमज नाही, पण ते एक अर्धसत्य मानलं पाहिजे. लोकशाही जर व्यक्तीला स्वातंत्र्य देत असेल, आणि प्रत्येकानं त्या मूल्याचं पालन केलं, तर त्या 'मूल्याधिष्ठित' वर्तणुकीचं पर्यवसान गोंधळात होईल, अनागोंदी माजेल आणि समाज हिंसक बनेल; हे सारं जंगलनियमानुसार अपेक्षितच आहे! समाज निर्माण करत असताना त्यावर नियंत्रण राखण्याच्या प्रक्रियेतूनच मानवाकडून लोकशाही मूल्यं निर्माण केली गेली, ती प्रस्तुत निसर्गनियमावर मात करण्याकरताच. ह्या कार्यकारणभावाच्या आविष्कारांचा विचार केला की त्या विचारश्रृंखलेतून हळूहळू लोकशाही मूल्यांची तात्त्विक बैठक उलगडत जाते; ती अशी –

१. स्वत:ला स्वातंत्र्य हवं तसंच ते इतरांनादेखील अपेक्षित असणार, ह्या आकलनातून लक्षात आलं की प्रत्येकाची व्यवहारातील कृती 'बहुमता'चा आदर राखूनच झाली पाहिजे; हे पहिलं लोकशाही मूल्य.

२. अल्पमतातील व्यक्ती स्वत:चा वेगळा विचार व्यक्त करू शकते का, बहुमतातील व्यक्तीचं मतपरिवर्तन साधू शकते का? ह्या प्रश्नांचं होकारार्थी उत्तर म्हणजेच लोकशाहीचं दुसरं मूल्य. विचार प्रकटनाचा, स्वत:चा दृष्टिकोन इतरांना पटवून देण्याचा अधिकार लोकशाहीच्या ह्या तत्त्वानुसार प्रत्येकाला लाभतो.

३. लोकशाहीच्या पहिल्या मूल्यासंबंधातील अपवाद नमूद करण्यासाठी, किंवा अल्पमतात असणाऱ्यांना मर्यादित व्यावहारिक स्वातंत्र्य देण्यासाठी तिसऱ्या लोकशाही मूल्याचा उगम झाला. एखाद्याची वा एखाद्या गटाची वागणूक बहुतांच्या वैचारिक पठडीला मानवणारी नसली तरीही त्या व्यक्तीला वा त्या गटाला तशा वर्तणुकीचं स्वातंत्र्य असू शकतं का? ह्या प्रश्नाचं उत्तर एका अटीवरच होकारार्थी असू शकतं. संबंधित वर्तणुकीतून इतरांवर बंधनं येऊ नयेत व इतरांना त्यापासून कोणत्याही प्रकारची हानी पोचण्याची शक्यता नसावी; इतरांना ती बाब व त्या बाबीतून निर्माण होणारी वर्तणूक अडचणीची ठरणार नाही, हीच ती अट.

उपरोक्त तीन पायाभूत तत्त्वांतूनच इतर लोकशाही मूल्यांचा आविष्कार झाला असणार, हे मानण्यात अडचण नसावी. प्रस्तुत तात्त्विक पार्श्वभूमीवर भारतातील राजकीय वातावरण व समाजाच्या सद्य परिस्थितीवर कारणमीमांसा साधणारा एक लेख काही काळापूर्वी माझ्या वाचनात आला. त्याचं शीर्षक होतं, ''उत्तम लोकशाहीसाठी हवा मूल्यविचार''. ('सकाळ', पुणे, सोमवार, ३१ ऑगस्ट

---

(पान क्रमांक १४ वरून)

'संकल्पनाकोश' तुम्हाला साह्य करील.

अशा प्रकारचे अगणित तपशील वाघे यांनी या 'संकल्पनाकोशा'त समाविष्ट केले आहेत आणि या कोशाचे संदर्भमूल्य वाढवले आहे. जिज्ञासापूर्तीचा परमानंद अनुभवण्यासाठी तुम्हाला हा संकल्पनाकोश मुळातच पाहावा लागेल.

या कोशाच्या दहा विभागांची यादी मुद्दाम उद्धृत करतो : धर्म, काल, विश्व, प्राणी व वनस्पती, मानवी शरीर, कुटुंब संस्था, नागरिक जीवन, गुणावगुण, मन व स्वभाव आणि ललित कला. यावरून या कोशाची व्याप्ती तुमच्या लक्षात येईलच, शिवाय तो सिद्ध करण्यासाठी सुरेश वाघे यांनी घेतलेले अफाट परिश्रमही तुमच्या लक्षात येतील.

प्रस्तुत कोश सिद्ध करण्यासाठी व्याकरणग्रंथ अभ्यासण्यापासून नाना साधनांचा धांडोळा घेण्याचा अथक, एकहाती प्रयत्न वाघे यांनी केला आहे. त्यासाठी त्यांना भरभरून दाद द्यायला हवी. आपल्या ज्ञानाच्या, संदर्भाच्या कक्षा विस्तारणारे ग्रंथ संख्येने अल्प असतात; पण त्यांचे महत्त्व वादातीत असते.

सुरेश पांडुरंग वाघे यांचा प्रस्तुत कोश नि:संशय या वर्गातला आहे. मराठी भाषेचे फार मोठे ऋण वाघे यांनी फेडले आहे!

**जयवंत वसंत चुनेकर**
१४४/३, ॐकार, स्वप्ननगरीजवळ,
जाधव कॉलनी, बेलवली,
बदलापूर (प.)
भ्रमणध्वनी : ९९६९० ३१९३५
निवास : ०२५१-२६७२७०७

२००९) सुरेशचंद्र पाध्ये ह्यांचा तो संपादकीय लेख भारतातील लोकशाही आदर्श ठरण्यासाठी काही ठोस मुद्यांवर चर्चा साधतो. बऱ्याचदा संपादकीय लिखाण उत्तम टीका साधतं. समाज व राजकारणावरील अशा लिखाणातून उत्तम भाष्य होतं आणि केलेलं शास्त्रोक्त विवेचनही वाचकांना भावतं. परंतु, विद्वत्तापूर्ण केलेलं ते लेखन सहसा कोणतीही उपाययोजना सुचवत नाही. पाध्ये ह्यांचा प्रस्तुत लेख मात्र सकारात्मक व परिपूर्ण वृत्तपत्रकारितेचं एक चांगलं उदाहरण मानलं पाहिजे. लेखातील पाध्येंची विधानं संपादित करून त्यांच्याच शब्दांत मांडून त्या लेखाच्या आशयाचं सार इथं सादर करतो.

● ''समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, पिळवणुकीच्या विरोधाचा हक्क, धर्माचरणाचा हक्क आणि घटनात्मक उपाययोजनांचा अवलंब करण्याचा हक्क, हे सर्वसामान्यत: मूलभूत हक्क मानले जातात---- या हक्कांची जपणूक करणे हेदेखील लोकशाही चौकटीच्या आधारानेच होण्याची गरज आहे.

● ''क्वचित, कायद्यात रूपांतरित झालेल्या बाबींना, (जर) त्या लोकशाही मूल्यांच्या विरोधात असतील तर, कडाडून विरोध करण्याच्या हक्कांचा वापर करून संबंधित बाबी---- बदलून घेण्यासाठी बहुमताच्या विरोधात उभे ठाकण्याचे स्वातंत्र्यही वापरले जायला हवे.

● ''बहुतांच्या अंतराला (अंतर्मनाला) हात घालून अभ्यास, अवलोकन, अनुकरण आणि अनुशासन या चतु:सूत्रीचा वापर केला जाणे, हे एक सामूहिक तत्त्व म्हणून पाळले तर लोकशाही मूल्ये अधिक बलवान होतील.

● ''आपला मुद्दाच रास्त आहे अशी भावना असेल तर बहुमताचे मतपरिवर्तन वैचारिक पातळीवर करण्यासाठी संबंधितांचे प्रबोधन करण्यावर भर देणे आवश्यक असते.

● ----(शासन) ज्यांच्या मताच्या आधाराने चालते त्या मतदारांमध्येही (लोकशाही मूल्ये) अधिक जोरकसपणे विकसित व्हायला हवी(त).

● ---- (लोकशाहीत) सामाजिक सूज्ञता आणि प्रगल्भता यांचा राज्य संस्थेवर पुरेसा परिणाम पडण्यासाठी मुळात समाज सूज्ञ आणि प्रगल्भ होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी (योग्य) शिक्षण सर्वदूर जाणे---- ही एक महत्त्वाची बाब आहे.

● ''भारतीय जनमानस हे मूलत: राजेशाही परंपरेतून वाढले आहे. त्यामुळे 'एक होता राजा'सारख्या गोष्टींतून बालमानस घडवले जाते. तिथपासूनच लोकशाही मूल्ये रुजवण्याचा प्रारंभ व्हायला हवा. शिक्षणाच्या प्रत्येक शिडीवर या मूल्यांचा अधिकाधिक विकसित अध्याय मनामनात रुजवायला हवा.''

मूल्य व व्यवस्था ह्यांची सांगड घालण्यासाठी सर्वांच्या परिचयाचं एक घरगुती उदाहरण घेऊ. काही कुटुंबप्रमुख हुकुमशहा असतात, परंतु असेही अनेक बाप आढळतात की जे घरातील मुलाबाळांनासुद्धा 'व्यक्तिस्वातंत्र्य' देतात. अशा 'लोकशाही' कुटुंबात मुलांना कोणतं व किती मतस्वातंत्र्य देणार, हा व्यवस्थेचा भाग झाला. व्यवस्थेचा विचार करताना प्रत्येक मूल स्वत:च्या भल्याचा क्षेत्राबरहुकूम विचार करू शकतं का, ते ते मूल त्या त्या संबंधातील निर्णयासाठी सज्ञान व सक्षम आहे का, हे प्रश्न उद्‌भवतात. तसं नसेल, तर ते स्वातंत्र्य 'लोकशाही' वृत्तीच्या कुटुंबातही त्या त्या मुलाला दिलं जात नाही. हेच तर्कशास्त्र, हाच कार्यकारणभाव देशाची लोकशाही व्यवस्था निर्माण करताना घटनाकारांकडून आधारभूत मानला जातो.

उपरोक्त स्पष्टीकरणातून जे प्रश्न उद्‌भवतात ते म्हणजे भारतातील तमाम नागरिक देशानं अंगिकारलेल्या लोकशाही पद्धतीत मतदान करण्यासाठी सज्ञान व सक्षम आहेत का? फक्त वय झालं म्हणून त्यांना मतदानाची क्षमता प्राप्त झाली, असं मानणं योग्य आहे का? आपलं भलं कशात आहे, हे समजण्याची त्यांची पात्रता आहे का? निवडणूक प्रक्रियेत गरजेच्या सुधारणा साधणं हा त्यावरील एक उपाय ठरू शकतो. परंतु, एक तर तो उपाय दूरगामी नाही व त्या उपायातून अपायकारक नियम निर्माण होण्याची शक्यताही आजच्या भारतातील राजकीय परिस्थितीत नाकारता येत नाही.

आडातच नसल्यामुळे घराघरांतून लोकशाही मूल्यं पोहऱ्यात येणं, रुजवली जाणं कठीण आहे. म्हणूनच पाध्ये म्हणतात तसं शिक्षण - लोकशाही मूल्यशिक्षण - 'सर्वदूर जाणं' गरजेचं आहे. तसं शिक्षण सर्वदूर आपलं आपण जाणं शक्य नाही. त्याकरता प्रयत्न करावे लागतील, ही बाब 'लोक'शाहीतील आम्ही 'लोक' विसरतो. स्वातंत्र्यलढ्यातून देशाला स्वातंत्र्य मिळालं, देश प्रजासत्ताकही झाला. परंतु, संदर्भातील प्रजेच्या मानसिकतेत मात्र गरजेचा बदल साधला गेला नाही; आम्ही वृत्तीनं होतो तिथेच राहिलो. आता लढा हवा आहे तो आमची वृत्ती बदलण्याचा, स्वत:च्या भल्याची जबाबदारी पेलायला शिकण्याचा, प्रजासत्ताक देशातील प्रजेनं योग्य शासनकर्ते निवडण्याचा.

आम्हा सर्वांना विकसित देशांतील शिस्तबद्ध, कायद्यानुसार होणाऱ्या व रोजच्या जीवनातील भ्रष्टाचारमुक्त सामाजिक वागणुकीचं, व्यवहारांचं कौतुक वाटतं, आकर्षण असतं. मात्र आम्ही हे लक्षात घेत नाही, की त्यासाठी तो समाज शिक्षणावर योग्य खर्च (वेळ व पैसे) करायला तयार असतो. भारतातील केंद्र व राज्य शासनांचा शिक्षणावरील खर्च साधारणत: अंदाजपत्रकांच्या चार टक्क्यांच्या आसपास असतो. तुलनात्मक दृष्टीनं बघायला गेलं तर विकसित पाश्चात्त्य देशांत तोच खर्च दहा टक्क्यांच्या जवळपास जातो. त्याच कारणामुळे तेथील शालेय शिक्षणात विद्यार्थ्यांना 'उद्याचे नागरिक' घडवण्यासाठी विशेष प्रयत्न घेतले जातात ही नोंद घेण्यासारखी बाब आहे. शिक्षणाचा प्रमुख उद्देश व्यक्तिविकास साधण्याचा मानूनच समाज घडवला जातो.

स्वातंत्र्यानंतर साठ वर्षांनी, आजही, आमचं शिक्षण 'नोकरी-अभिमुख' असंच आहे; जी शिक्षण पद्धती ब्रिटिश राज्यकर्त्यांना गरजेची होती, त्यांचं लक्ष्य देशातील मानवविकास हे नव्हतंच. पाश्चात्त्यांचं अंधानुकरण नको, पण आमच्या देशाची संस्कृती, देशातील परिस्थिती व गरजेचा मानवविकास साधण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. त्या दृष्टिकोनातून मानवविज्ञान शाखांतील आपल्या ज्ञानवंतांना भारतातील शालेय शिक्षणासाठी योग्य अभ्यासक्रम तयार करता येणार नाही का? ते निश्चित शक्य आहे. म्हणूनच, नागरिकत्व, सामाजिक बांधिलकी व लोकशाही संविधान ह्या विषयांचा योग्य अभ्यासक्रम आपण बनवला पाहिजे. जोडीला, जागतिक स्तरावर उपलब्ध असलेल्या अद्ययावत संशोधनाचा फायदा घेऊन बाल व पौगंडावस्थेतच मूल्यशिक्षण रुजवण्याकरता समर्पक अध्यापनपद्धती (पेडगॉगी) समाविष्ट करून तो अभ्यासक्रम देशभरातील शालेय शिक्षणात अंमलात आणला पाहिजे.

असंही मानलं जातं, की ज्या देशाच्या अंदाजपत्रकात शिक्षणावरील खर्चाची तरतूद संरक्षणावरील खर्चापेक्षा कमी असते, तो देश मानवविकासाकडे पुरेसं लक्ष देत नाही. सर्वांगीण मानवविकास हे शासनाचं आद्य कर्तव्य आहे आणि लोकशाहीत त्यासाठी शासनावर प्रजेककडून दबाव निर्माण करणं ही प्रजेचीच जबाबदारी मानली पाहिजे.

पाध्येंच्या लेखाचं शीर्षक 'उत्तम लोकशाहीसाठी हवा मूल्यविचार' हे आपल्या समाजाच्या आजच्या उणिवेवर अचूक बोट ठेवतं. भारतीय नागरिकत्व व संबंधित मूल्यशिक्षणाचा देशभरातील शालेय शिक्षणात आज समावेश केला तर उद्याचा नागरिक तरी लोकशाही राबवण्यासाठी सक्षम होईल व तो मूल्याधिष्ठित समाज सर्वार्थानं लोकशाहीच्या पालनासाठी समर्थ बनवता येईल.

प्रस्तुत मूल्यशिक्षणासाठी शालेय शिक्षणात पुरेसा वेळ व महत्त्व द्यावं लागेल आणि त्यासाठी पुरेशा खर्चाची तरतूदही करावी लागेल. हेसुद्धा लक्षात घेतलं पाहिजे की देशभरातील शाळाशाळांत सुचवलेल्या समाजशिक्षणाची अंमलबजावणी शासना-कडूनच होऊ शकेल. देशाची खरी गरज आहे ती असं शालेय शिक्षण अनिवार्य करण्याची, त्यासाठी शासनाला राजी करण्याची आणि कराव्या लागणाऱ्या जास्तीच्या खर्चासाठी प्रजेनं तयार असण्याची. गंमत म्हणजे, लोकशाहीत ह्या साऱ्या गोष्टी प्रजेवरच अवलंबून असतात. म्हणूनच असं वाटतं, की गरज आहे ती एखाद्या आगरकरांची आणि साधायची खरी गरज आहे ती समाजाची वृत्ती बदलण्याची. टिळक आणि गांधी ह्यांचा लढा होता स्वातंत्र्यासाठी, ब्रिटिशांच्या विरुद्ध; स्वातंत्र्य चळवळीतून तो त्यांनी साधला. वृत्तीबदलाची चळवळ हा आमचा लढा मात्र आमच्याच विरुद्ध असणार आहे; त्यात आम्ही कमी पडता कामा नये.

सत्शक्तीच्या संघटनातून ह्या उपयुक्त चळवळीला हातभार लागावा ह्याच दिशेनं 'जनसंवाद'चे प्रयत्न सुरू असतात.

**सु. गो. तपस्वी**
समन्वयक-जनसंवाद
भ्रमणध्वनी - ९७६६१ ५२२५३
suhas@fandsindia.com

## मराठी संशोधनाला जागतिक मान्यता

युरोप व अमेरिकेतील प्रकाशकांच्या जागतिक संघटनेने चालू वर्षी इंग्रजीत अनुवाद करून प्रकाशित करण्यासाठी जगातील चार हजार ग्रंथ निवडले आहेत. त्यात प्रसिद्ध तुलनाकार लेखक व इंग्रजीचे माजी प्राध्यापक डॉ. आनंद पाटील यांच्या बारा वर्षापूर्वी प्रकाशित झालेल्या 'ब्रिटिश बॉम्बे आणि पोर्तुगीज गोव्यातील वाङ्मय' या पुस्तकाचा समावेश आहे. हा ग्रंथ 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केला आहे.

जर्मनीतील लॅप लॅम्बर्न आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेने तसा करारही त्यांच्याशी नुकताच केला. स.गं. मालशे संशोधनवृत्ती घेऊन त्यांनी तो लिहिला होता. म.सा.प. पुणेचा शि.म. परांजपे पुरस्कारही त्याला मिळाला होता. त्यांचे 'लिटररी इन टू कम्पॅरेटिव्ह कल्चर क्रिटिसिझम' पंजाबमध्ये नुकतेच प्रकाशित झाले. त्याला अमेरिकेतील नामवंत तुलनाकार स्टीव्हन टोटोसी यांची प्रस्तावना आहे. मराठी संशोधनाला जागतिक मान्यता मिळवून दिल्याबद्दल दिनेश पाटील, 'आंतरराष्ट्रीय साहित्यिक पाटीलकी' हा ग्रंथच संपादित करीत आहेत. डॉ. पाटील यांचे अभिनंदन होत आहे. त्यांचे ग्रंथ अमेझॉन डॉट कॉमवरही उपलब्ध होणार आहेत.

## 'रुची' संबंधीचे प्रकटन

संपादक, मुद्रक, प्रकाशक
**दिनकर गांगल**

राष्ट्रीयत्व-भारतीय

मालकी : ग्रंथाली विश्वस्त संस्था


पत्ता : इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : २४४७ ४८ ४३

प्रसिद्धीचा नियतकाल
दर महिन्याला, १० तारीख

**प्रकाशन स्थळ**
इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : २४४७ ४८ ४३

# दिलीप रानडे यांचे कल्पित अवकाश आणि सत्याचा लक्ष्यवेध

## दीपक घारे



द शिमर ऑफ द सेल्फ, २००८, कॅनव्हासवर ॲक्रिलिक

दिलीप रानडे यांच्या चित्रांचे प्रदर्शन 'द शिमर ऑफ द सेल्फ' जानेवारी महिन्यात पंडोल आर्ट गॅलरीत झाले. रानडे यांची चित्रे कठोर वास्तव आणि मनोव्यापाराचे अद्‌भुत जग यांच्या सीमारेषेवर रेंगाळणारा एक वेगळाच अनुभव देतात. त्यांचे रेखांकन, रंगलेपन आणि रंगसंगती मोहवणारी असली तरी चित्रांतला आशयाचा अंत:स्तर अस्वस्थ आणि विचारप्रवृत्त करणारा असतो. परीकथांचे फिक्शनल लॉजिक वापरून, पाहणाऱ्याला वास्तवाची मर्मदृष्टी देण्याची ताकद या चित्रांमध्ये आहे.


'द शिमर ऑफ द सेल्फ' हे नाव अर्थपूर्ण आहे. रानडे यांची शीर्षके नेहमीच अर्थपूर्ण असतात. जशी- फिक्शनल लॉजिक, शिफ्टिंग लॉजिक, मेडिटेशन, ट्वेंटिएथ सेंच्युरी फॉसिल. 'द शिमर ऑफ द सेल्फ' चित्रात गडद काळसरनिळ्या पार्श्वभूमीवर एक मोठा मासा विभागलेला दाखवला आहे आणि मध्यभागी चंद्रप्रकाशात न्हालेला एक तरुण उभा आहे. त्याचे पाण्यात पडलेले, मंद लाटांवर हेलकावणारे प्रतिबिंब गडद निळ्या पार्श्वभूमीला एक गूढ खोली देते आणि स्वप्नवत वातावरण निर्माण करते. शारीर आणि मानसिक, आदिम आणि वर्तमान अशा विरोधी अवस्थांमधून व्यक्त होणारे असतेपणाचे आकलन शिमर (shimmer) आणि सेल्फ (self) शब्दांमधून अचूकपणे व्यक्त झाले आहे. प्रकाशमान होणारे गोड शिरशिरी आणणारे पाण्यावरचे तरंग म्हणजे shimmer. ते सेल्फशी जोडले गेले की गूढ आणि आध्यात्मिक होते.

या प्रदर्शनाच्या कॅटलॉगमध्ये रणजित होस्कोट यांनी समीक्षक म्हणून लिहिले आहे तर दिलीप रानडे यांनी स्वत:च्या निर्मितीप्रक्रियेबद्दल लिहिले आहे. दोन्ही लेख महत्त्वाचे आहेत. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधले शिक्षण पूर्ण झाल्यावर रानडे यांनी म्युझियममध्ये आर्टिस्ट आणि मॉडेलर म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. आता ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात सीनियर क्युरेटर म्हणून काम करतात.

म्युझियममधील कामामुळे वैज्ञानिक यथार्थवादाचा (scientific realism) रानडेंना परिचय झाला. म्हणजे असे, की आर्ट स्कूलमध्ये दिसेल तसे, म्हणजेच यथातथ्य चित्रण करण्याचे शिक्षण मिळालेले होते. पण वस्तुसंग्रहालयात काम करताना निसर्गातील प्राण्यांच्या शरीर-रचनेचे, त्यांच्या सवयींचे बारकावे निर्दोषपणे चित्रात आणावे लागत. पक्ष्यांच्या सूक्ष्म फरक असलेल्या रंगछटांचा परिचय रानडेंना झाला तो डायोरमा आणि टॅक्सीडर्मीचे काम केल्यामुळे. टॅक्सीडर्मीसाठी अनेकदा प्राणी किंवा पक्षी त्यांच्या त्वचेची तकाकी कायम राहावी म्हणून मुद्दाम मारले जात आणि मग भुसा भरून ते जिवंत वाटावेत अशा पद्धतीने तयार केले जात. जीवन-मृत्यू-पुनर्जीवन या प्रक्रियेतून रानडेंना वापरातल्या वस्तू, जलचर, भूचर, वनस्पती यांचे जीवन, संस्कृती, संग्रहालय, अश्मीभवन यांच्याशी असलेले नाते एका वेगळ्या प्रकारे उलगडत गेले. त्याचा प्रत्यय रानडे यांची यथार्थाचा आभास असलेली आणि संस्कृतीसापेक्ष असलेली चित्रे पाहताना येतो.


प्रदर्शनाच्या कॅटलॉगमध्ये रानडे यांनी चित्रनिर्मितीमागची भूमिका नेमकेपणाने मांडली आहे. दृश्यकलेच्या बाबतीत पॉल क्ली, मॅक्स अर्न्स्ट, रेनी मॅग्रिट आणि मार्क रोथ्को यांचा सुरुवातीच्या काळात प्रभाव पडल्याचे ते सांगतात, तर साहित्याच्या प्रांतात काफ्का आणि गोगोल, तसेच ॲब्सर्ड थिएटर आणि मराठी प्रायोगिक रंगभूमीचे संस्कार झाल्याचे ते नमूद करतात. संग्रहालयात एखादा प्राणी अथवा आदिम संस्कृतीतला मानव यांच्या भोवतीचे वातावरण डायोरमाच्या माध्यमातून जिवंत करण्याचा प्रयत्न केला जातो तो वास्तवतेचा एक आभास असतो. संग्रहालयात काचेच्या कपाटात एखादी वस्तू मांडली जाते तेव्हा ती संदर्भमुक्त असते. तिचे मूळचे उपयुक्तता मूल्य, तिचा सांस्कृतिक संदर्भ अशा विविध अंगांनी तिचे होणारे आकलन सत्यदर्शनाची अनित्यता स्पष्ट करते.

रानडे यांनी गर्दीने खच्चून भरलेल्या रेल्वे डब्याचं उदाहरण दिले आहे. डब्यातल्या व्यक्ती शरीराने सहप्रवासी आणि समदुःखी असतात. पण त्यांची मने मात्र त्या क्षणाला वेगवेगळ्या दिशांनी भरकटत असतात. मनातले अवकाश नजीकच्या वास्तवापेक्षा खूप विस्तीर्ण असते. रानडे नजीकच्या म्हणजे व्यवहारातले किंवा बाह्य वास्तवातले काही तपशील घेऊन मनातल्या अवकाशाची व्याप्ती आपल्याला अशीच जाणवून देतात. रानडे यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना त्यातून नुसतीच फँटसी साकारायची नसते अथवा मेंदूतल्या जाणिवांचा अंत:स्तरच दाखवायचा नसतो, तर स्वयंपूर्ण असे चित्र अथवा शिल्प घडवायचे असते. त्यासाठी रानडे काही प्रतिमांचा वापर करतात. कुत्रा, मासा, ससा, भोपळा, फणस, पगडी आणि हॅट वगैरे. या प्रतिमांचा उपयोग रानडे म्हणतात त्याप्रमाणे प्रेक्षकांना आकर्षून घेण्यासाठी असतो. एकदा का प्रेक्षकाचा मासा गळाला लागला की चित्र त्याला अज्ञात अशा मनाच्या खोल गाभाऱ्यात घेऊन जाते आणि जीवनाचे कोडे उलगडण्याचा स्वत:चा मार्ग शोधण्यास उद्युक्त करते.




**ड्युएल, २००८, कॅनव्हासवर ॲक्रिलिक**

प्रदर्शनातील काही चित्रांचा या संदर्भात इथे उल्लेख करावा लागेल. 'डॉग इट डॉग', 'ड्युएल', 'द लॉस्ट किंग्डम' या चित्रांमधला आशय राजकीय/सामाजिक आहे. वासाहतिक, उत्तर वासाहतिक अशा दृष्टिकोनांतून या चित्रांकडे पाहता येईल. पण रानडे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन टोकांमध्ये विभागलेल्या दुभंगलेपणापेक्षा एकाच वास्तवाच्या शक्यतांची विविध रूपे म्हणूनच त्याकडे पाहतात. 'डॉग इट डॉग'मध्ये पगडी घातलेला आणि हॅट घातलेला अशा माणसांची एखादी बाहुली वाटावी अशा आकृती आहे. (मुखपृष्ठावरील चित्र पहावे.) या आडव्या, एकसंध आकृतीला छेद देणारी आणि चित्रात गतिशील चैतन्य आणणारी काळ्या कुत्र्याची प्रतिमा आहे. त्यातून कालविशिष्ट संस्कृतीच्या खुणा दिसतात, आणि सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रियाही सूचित होते. कुत्रा ही सामान्य माणसाची प्रतिमा असल्याचे रानडे यांनी म्हटले आहे. प्राणिजन्य जाणिवा आणि मानवी विचार यांच्यातली देव-घेवही त्यातून सूचित होते. 'ड्युएल' चित्रातही पगडीवाला आणि साहेब अशा समोरासमोर ठाकलेल्या, कळसूत्री बाहुल्या वाटाव्यात अशा प्रतिमा आहेत. या दोघांच्या हातात



**एलिफंटाइन सिडक्शन, २०१०, कॅनव्हासवर ॲक्रिलिक**



**ककून, २००८, कॅनव्हासवर ॲक्रिलिक**

फुलांचा गुच्छ आहे आणि मध्ये रिकामा फ्लॉवर पॉट. वर करड्या रंगाचा कळेल न कळेल असा एक पुंजका आहे. दोघांच्या छाताडावर टेकवलेल्या तलवारी आहेत. यातून ड्युएल म्हणजेच द्वंद्वाच्या अनेक शक्यता सूचित होतात. एकाच वेळेला काहीतरी नाट्यपूर्ण घडण्याची शक्यता आणि त्याच वेळेस एखादा क्षण गोठून जावा तशी स्तब्धता असा एक द्वंद्वात्मक अनुभव इथे येतो. 'द लॉस्ट किंग्डम'मध्ये जे काही आहे ते स्मृतिरूपच आहे. पुतळा, जमिनीवर पसरलेले प्राण्याचे कातडे, हॉर्न आणि हात, दूरवरचं राजवाड्यासारखे दिसणारे घर. इथे मानवी जाणिवा अश्मीभूत झालेल्या आहेत आणि बघणाऱ्याच्या दृष्टीनुसार त्या जिवंत होऊ शकतात.

'ककून' आणि इतर चित्रांमध्ये रानडे अधिक मूलभूत आणि तात्त्विक आशयाकडे वळतात. 'ककून' म्हणजे कोष. या चित्रात वस्त्राच्या कोषात एका स्त्रीचे शरीर गुरफटलेले आहे, फक्त पाय अनावृत आहेत. एका बाजूला काळ्या रंगातली एक पाठमोरी मॅनेक्वीनसारखी आकृती दाखवलेली आहे. हे चित्र पायाकडून काळ्या आकृतीपर्यंत किंवा काळ्या आकाराकडून पायापर्यंत पाहावे. वस्त्रांना संस्कृतीचे आवरण म्हटले तर माणसाला ते बंधनांमध्ये गुरफटून टाकते, दुसऱ्या बाजूला या बंधनांमधून मुक्त होण्याची प्रेरणाही देते. कोषात बंदिस्त होण्याची आणि त्यातून बाहेर पडण्याची प्रक्रिया एका अर्थाने या चित्रात आलेली आहे. 'मेडिटेशन', 'द शिमर ऑफ द सेल्फ', 'थिंकर' या चित्रांमध्ये आत्ममग्नता आहे. 'एलिफंटाईन सिडक्शन'मध्ये स्त्री-पुरुष अशा दोन प्रतिमा असल्या तरी हे युगुल आत्ममग्न माणूस, स्पर्शाने त्याला होणारी भोपळ्याच्या रूपाने चैतन्यतत्वाची जाणीव आणि खालच्या सावलीने पूर्ण होणारे आत्ममग्न जाणिवेचे वर्तुळ असा हा प्रवास आहे. 'थिंकर' चित्रामध्ये मानवी चेहरा आणि हाताचे शिल्प आहे. त्यातील सरळ आणि वक्ररेषा, त्यातून निर्माण होणारे उभे, आडवे, जड, सचेतन अशा विविध पातळ्यांवरचे आकारशिल्प प्रेक्षकाला गुंतवून ठेवतात. 'एलिफंटाईन सिडक्शन'मध्ये गडद निळ्या रंगछटांचे एक गूढरम्य वातावरण आहे. पुतळ्यासारखे भासणारे दोन चेहरे, त्यांच्यात मूकसंवाद प्रस्थापित करणारी हत्तीच्या सोंडेचा आकार सूचित करणारी लयबद्ध रेषा, सोंडेचे टोक स्त्रीप्रतिमेच्या वक्षस्थळावर विसावणे आणि त्यातून व्यक्त होणारी सुप्त कामुकता - इथेही शारीरिक पातळीवर काही घडत नाही, घडते ते मानसिक पातळीवर. 'इट मी नॉट' चित्रात आ वासलेला माणसाचा जबडा आणि त्यात तुकड्यांमध्ये विभागलेला मासा आहे. तोच मासा अलिप्त होऊन या अवस्थेकडे बघतो आहे. 'सर्प्राइज्ड मंक'मध्ये सर्वसंग परित्याग केलेला साधक उशाशी ठेवलेल्या हिरव्यागार फणसाकडे पाहून विचलित झाला आहे. स्वत: स्वत:कडे अलिप्तपणे पाहणे, म्हणजेच आत्ममग्नतेची आणखी एक शक्यता या दोन चित्रांमधून सूचित होते.


दिलीप रानडे यांनी रेनी मॅग्रिट आणि मॅक्स अर्न्स्ट या अतिवास्तववादी चित्रकारांच्या चित्रांमध्ये येणाऱ्या 'विशिष्ट अनुभवा'चा उल्लेख केला आहे. मॅग्रिटच्या चित्रांमध्ये असलेला बोलर हॅट घातलेला काळ्या सुटातला माणूस, फळे, पाईप अशा दैनंदिन वस्तूंचा केलेला प्रतिमात्मक वापर, चित्रणातला यथार्थतेचा फसवा आभास ही रानडेंच्या चित्रांशी असलेली वरवरची साम्यस्थळे झाली. पण दिलीप रानडेंच्या चित्रांमध्ये जी एक अनोखी अशी काव्यात्मता आहे, तिच्या मुळाशी असलेली जीवनातल्या सत्यदर्शनाबद्दलचे मूलभूत प्रश्न उपस्थित करण्याची जी क्षमता आहे त्याचा संबंध चित्रकलेतला अतिवास्तववाद (surrealism), साहित्यातला, अस्तित्ववाद (existentialism), न-नाट्यातला व्यस्ततावाद (absurdity) यांच्याशी आहे. विज्ञानातसुद्धा सत्यदर्शनाच्या एकच एक प्रारूपापेक्षा प्रारूप-सापेक्ष वास्तव (model-dependent - realismt) प्रारूपांची विविधता आता गृहीत धरली जाते. अतिवास्तववादी चित्रकारांनी वास्तवाला हवे तसे वाकवून वास्तवदर्शनाची एक अद्‌भुत प्रतिसृष्टी निर्माण केली, त्यात चमत्कृतीचा वापर अनेकदा केलेला असे. मॅग्रिटने अधिक गंभीरपणे मनोगम्य वास्तवतेकडे पाहिले आणि वास्तवदर्शनाच्या गृहितकृत्यांबद्दलच प्रश्न निर्माण केले. त्यासाठी नेहमीच्या, परिचित वस्तूंचे रूपांतर, नव्या वस्तूंची निर्मिती, प्रतिमेला शब्दांची जोड, अर्धजागृतावस्थेतील दृश्यप्रतिमा यांचा वापर मॅग्रिटने केला. बाहेरचे जग आणि आत्मभान

यांचे संबंध, त्याच्या विविध पातळ्यांचा शोध त्याने घेतला. दिलीप रानडे यांच्या चित्रांमध्येही फणस, भोपळा, मासा यांसारख्या परिचित वस्तूंचे रूपांतर झालेले दिसते. चित्रातल्या प्रतिमांना दिलेल्या शीर्षकांमुळे अर्थाला वेगळी कलाटणी मिळते. रानडे यांच्या चित्रांमधल्या प्रतिमाही एकाच वेळेस अश्मीभूत झालेल्या आणि चैतन्यपूर्ण वाटतात.

विरोधाभास असलेल्या वास्तवाचा शोध घेणे हे अस्तित्ववादी साहित्याचे आणि न-नाट्याचे प्रयोजन राहिलेले आहे. अस्तित्ववादी वास्तवदर्शनात काहीही व्यर्थ आणि निरर्थक भासले तरी ते तसे नसते. तिथे निरर्थक आणि अर्थपूर्ण, हातात हात घालून वावरत असतात. काफ्काच्या कथा-कादंबऱ्यात असंगत आणि चमत्कारिक घटना येतात. 'मेटॅमॉर्फसिस' कथेत कथानायकाचे रूपांतर अवाढव्य कीटकात होते. तर 'द ट्रायल'मधला जोसेफ के.वरचा खटला आणि सगळे वातावरण एखाद्या दिवास्वप्नासारखे वाटते. दिलीप रानडे यांचे एका चित्राचं शीर्षकच मुळी 'फ्रान्झ काफ्काज् फिक्शनल लॉजिक' असे आहे. काफ्काच्या साहित्यातली आत्ममग्नता रानडेंच्या चित्रांमध्येही दिसते. प्रायोगिक रंगभूमीने नाटक प्रोसिनियम आर्चच्या बाहेर नेले. नाटक आणि प्रत्यक्ष जीवन यांच्यातलं नाते नव्याने प्रस्थापित केले. दिलीप रानडे यांच्या चित्रात प्रोसिनियम आर्च नकळतपणे येते. वास्तव भासणारे दृश्यरूप हे नाटक आहे, आभास आहे याचीही जाणीव त्यांची चित्ररचना करून देत असते. रानडे यांच्या चित्रांचे अतिवास्तववादाशी आणि मराठी, इंग्रजी साहित्यातल्या अस्तित्ववादाशी एक आंतरिक नाते आहे. ते समजून घेतले तर त्यांची चित्रे अधिकच अर्थपूर्ण वाटू लागतात.

संदर्भ : The Shimmer of the Self : Dilip Rande, Recent Paintings Catalogue, published by Pundole Art Gallery, Mumbai, 2011

**दीपक घारे**
४, शिवांजली,
पाथर्ली रोड, गोग्रास वाडी,
डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१





## प्रत्ययपर्व – मनोहर जाधव

सामान्य माणसाला शोधणे, सामान्य माणसातील सृजनात्म भेटणे हेच कलासाहित्याचे उद्दिष्ट आहे, असे कविवर्य नारायण सुर्वे म्हणतात.मनोहर जाधव व त्यांची कविता योग्य वाटेवर आहे असे वाटते, ते या अर्थाने!
या कवीचे वास्तवाचे, मूर्ताचे, अवतीभवतीच्या घटितांचे संवेदन जागृत आहे. मनोहर जाधवांची कविता अशाच संवेदनांतून प्रस्थान ठेवते.

**– प्रा. रा.ग. जाधव**

**मूल्य ७० रुपये। सवलतीत ४० रुपये**




## गारुड गझलचे – सदानंद डबीर

उर्दू गझल ऐकताना, मराठी माणसाच्या तोंडूनही 'वाऽ क्या बात है' अशी नकळत दाद येते. ती नेमकी कुठल्या गोष्टीला येते? मराठी गझलला तशी दाद का येत नाही? हे 'काहीतरी'- ज्याला 'गझलियत' म्हणतात, जी शब्दात सांगता येत नाही, ती मराठी गझलमधून निसटून जाते आहे का?
समकालीन उर्दू कवींच्या गझला वाचल्यावर जाणवते की, उर्दू गझल 'बहुरूपिणी' आहे. आधुनिक उर्दू गझल अगदी तरल कवितेच्या शैलीनेही लिहिली जाते. बव्हंशी मराठी गझल मात्र एकसूरी वाटते का? मराठी गझलच्या संदर्भात, समकालीन उर्दू गझलांचा तुलनात्मक सौंदर्यवेध घेतला आहे सिद्धहस्त मराठी गझलकार सदानंद डबीर ह्यांनी.

**– उषा मेहता**

**मूल्य १२० रुपये । सवलतीत ७५ रुपये**

# वाहतूक ठप्प, बसू नका गप्प!

**प्रतिनिधी**

केवळ पन्नास वर्षांपूर्वीची मुंबई ही सर्व भारतामधील लोकांसाठी एक रम्य आणि आकर्षक, आधुनिक नगरी होती. मुंबईचा समुद्र, मुंबईच्या इमारती, देखण्या वास्तू, मुंबईची भेळ ह्यांच्याइतकीच शान वाहतूक व्यवस्थेने मुंबईला मिळवून दिली होती. मुंबईच्या लोकलची वाहतूक जलद, कार्यक्षम आणि आरामदायक होती. गर्दी असली तरी ती जीवघेणी नसे. शिवाय त्यांचा वापर करणारे उपनगरवासीय असत. मुंबईची हद्द जेव्हा उपनगरांपर्यंत विस्तारलेली नव्हती तेव्हा ट्रॅम आणि बेस्टच्या बसेस ह्यांच्यामुळे मुंबईचे जीवन सुरळीतपणे चालत असे. वाहतूक क्वचित ठप्प होत असेलही कदाचित पण तेव्हा जनतेचा आवाजही मोठा असे. मुंबईच्या लोकांना तेव्हा गप्प बसवणे कठीण असे.

पण गेल्या दहा-वीस वर्षांत हे चित्र झपाट्याने पालटले आहे. मुंबईच्या वाहतूकव्यवस्थेवरचा ताण इतका वाढला आहे आणि त्यामुळे सर्व नागरिक इतके हैराण असतात की त्यांना आता काही आवाज काढायलाही बळ उरत नसावे! म्हणूनच अशोक दातारांना वाहतुकीच्या समस्येवर पुस्तक लिहून लोकांना बसू नका गप्प असे सांगावेसे वाटते आहे! फेब्रुवारीच्या तेरा तारखेला ग्रंथालीने अशोक दातार लिखित 'वाहतूक ठप्प, बसू नका गप्प!' ह्या पुस्तकाच्या निमित्ताने दादरला एक चर्चा आयोजित केली होती. ह्या निमित्ताने वाहतूकक्षेत्राशी निगडित असलेले सरकारी आणि नगरपालिकेचे काही अधिकारी आणि नागरिक ह्यांची प्रत्यक्ष चर्चा व्हावी हा मनोदय होता. परंतु ह्या चर्चेसाठी कोणताही अधिकारी, प्रशासक चर्चेला येऊ शकला नाही. लोकमत-आयबीएन वाहिनीचे निखिल वागळे ह्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर संवाद घडवावा ही अपेक्षा त्यामुळे प्रत्यक्षात आली नाही. परंतु रविवार असूनही मोठ्या संख्येने नागरिक कार्यक्रमाला उपस्थित राहिले आणि ह्या प्रश्नाबद्दल असलेली कळकळ आणि काळजी त्यामधून दिसून आली.

ह्या निमित्ताने जी चर्चा झाली ती नक्कीच उल्लेखनीय ठरली. निखिल वागळे, सुधीर बदामी, सुलक्षणा महाजन आणि पुस्तकाचे लेखक अशोक दातार ह्यांनी ह्या वाहतुकीच्या समस्येचे स्वरूप, त्यात निर्माण झालेल्या गंभीर समस्या आणि ह्या समस्यांवरची संभाव्य उत्तरे ह्यांचा वेध चर्चेच्या निमित्ताने घेतला आणि उपस्थितांनीही चर्चेमध्ये प्रश्नोत्तराच्या रूपाने चांगलीच रंगत आणली. वाहतुकीची समस्या ही सर्वांनाच भेडसावणारी आणि गंभीर होत चाललेली समस्या झाली आहे आणि त्यामुळे मुंबईचे भविष्यही किती अंध:कारमय दिसते आहे हेही अधोरेखित झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अशोक दातार ह्यांनी वाहतूक प्रश्नासंबंधी निर्माण झालेल्या अनेक समस्यांची माहिती दिली. त्यांनी पुस्तकामध्ये दिलेली माहिती आणि आकडेवारी ही मुख्यत: सरकारी खात्यांकडूनच माहितीच्या अधिकारात मिळवली असल्याचे सांगितले. वाहतूक व्यवस्थेमध्ये मुंबईच्या रस्त्यावरील सातत्याने संथ होत गेलेल्या आणि वेळोवेळी ठप्प होणाऱ्या वाहतूक समस्येमागील अनेक कारणांचा ऊहापोह केला. मुंबईचे एकेकाळी प्रशस्त वाटणारे आणि सातत्याने वाहणारे रस्ते आता संख्येने वाढलेल्या खाजगी मोटारींमुळे दिवसेंदिवस गच्च भरून गेले

अशोक दातार यांनी वाहतूक समस्येवर लिहिलेले 'वाहतूक ठप्प, बसू नका गप्प!' हे पुस्तक ग्रंथालीने प्रसिद्ध केले. त्यानिमित्त एक परिसंवाद आयोजित केला होता. या त्रासदायक प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी वक्त्यांसह उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

आहेत. परिणामी, मुंबईची वाहतूक त्यामुळेच अतिशय संथगती झालेली आहे. एकीकडे मोटारींची नवीन नवीन, आकर्षक आणि वेगवान, आरामदायी प्रवासाची हमी देणारी मॉडेल्स रस्त्यावर उतरवण्याची स्पर्धा उत्पादकांमध्ये सुरू झालेली असताना प्रत्यक्षात मात्र वाहतूक संथ आणि माणसांच्या सहनशक्तीचा अंत बघणारी झालेली आहे. एकीकडे पेट्रोलचे दर वाढत आहेत, मोटारींच्या किमती वाढत आहेत, तरीही मोटारींचा हव्यासही वाढत असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक रस्ते हे खाजगी मोटारींच्या पार्किंगमुळे वाहतुकीसाठी अडवणूक करणारे ठरले आहेत आणि ह्यावर अनेक सोपे, साधे उपाय असूनही सरकार आणि महापालिका मात्र त्यांचा अवलंब करण्याऐवजी मोठे मोठे वाहतूक प्रकल्प उभारण्याच्या मागे लागले आहेत. बेशिस्त वाहनचालक, बेशिस्त वाहतूक आणि पोलिसांची अपुरी संख्या ह्यामुळे वाहतुकीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्यामुळे रस्त्यांवर बेबंदशाही आणि भांडणे निर्माण झाली आहेत. वाहतूक समस्येचे स्वरूप असे गंभीर झाले असताना त्यावर केवळ मोठे प्रकल्प किंवा खर्चिक उपाय आवश्यक आहेत असा बहुतेक राजकारणी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समज झाला आहे. त्यामुळे वाहतूकव्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या आणि अतिशय कमी खर्चामध्ये शक्य असलेल्या उपायांकडे प्रशासक मुळीच लक्ष देत नाहीत. रस्त्यावर पादचाऱ्यांना रस्ते ओलांडण्यासाठी असलेले झेब्रा पट्टे नीट आखले, पार्किंगच्या जागा नीट आखल्या, बस आणि बस थांब्यावरील माहिती नीटपणे लिहिली गेली तरी वाहतुकीला त्याची खूप मदत होते हे दातारांनी अनेक उदाहरणांद्वारे विषद केले.

सुधीर बदामी ह्यांनी सार्वजनिक वाहतूक सेवेच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या नानाविध प्रकारच्या तंत्रज्ञानाची माहिती दिली तसेच त्यांचे तुलनात्मक खर्च कसे कमी-जास्त असतात, त्याचीही माहिति दिली. मोठ्या संख्येने प्रवाशांना सेवा पुरविणाऱ्या सार्वजनिक बस वाहतुकीवर पडलेला ताण, कमी होणारा वेग, वाढता खर्च ह्या सर्व समस्यांवर राखीव बस मार्गिक आणि बीआरटीएस ह्या सेवांचा वापर प्राधान्याने सुरू करण्याची मुंबईमध्ये खूप गरज आहे. कमी खर्चात आणि कमी वेळेत अशा सेवा देता येतील आणि त्यासाठी मेट्रोसारख्या खर्चिक पर्यायांची गरज कमी होईल असे त्यांचे प्रतिपादन होते. मुंबई प्रादेशिक वाहतूक सुधारण्यासाठी प्रशासकीय समन्वयाची गरजही त्यांनी व्यक्त केली. अहमदाबादमध्ये यशस्वीपणे चालवलेल्या बीआरटीएस सेवेचे उदाहरणही त्यांनी दिले आणि जे अहमदाबादमध्ये करता येत आहे त्या धर्तीवर मुंबईमध्ये प्रयत्न होणे आवश्यक आहे ह्याचा पुनरुच्चार केला.


शहरांची वाढ आणि वाहतूक तंत्रज्ञान ह्यांचा अतिशय जवळचा संबंध आहे हे सुलक्षणा महाजन ह्यांनी अठराव्या शतकातील वाहतूक समस्येच्या उदाहरणातून सांगितले. लंडन, न्यू यॉर्कसारख्या शहरांमध्ये रेल्वेची उभारणी प्रामुख्याने दूरवरच्या गावांना जोडण्यासाठी झाली. त्याकाळी शहरांच्या अंतर्गत होणारे लोकांच्या आणि मालाच्या वाहतुकीचे प्रमुख साधन घोडागाड्या हेच होते. त्याकाळी चार-आठ घोडे असणाऱ्या ट्रॅमही वापरल्या जात. सुमारे तीन लाख घोडे त्या शहरांमध्ये वाहतुकीच्या क्षेत्रासाठी वापरले जात आणि त्यांच्यामुळे होणारे अपघात, घाण, शेणाचा चिखल, त्यावर घोंगावणाऱ्या माशा आणि डास, त्यांच्यामुळे नदी पात्रांचे होणारे प्रदूषण, दगडी रस्त्यावरील घोड्यांच्या टापांमुळे होणारे ध्वनिप्रदूषण, रस्त्यांमध्येच मरून पडणारे घोडे, घोड्यांचे तबेले, त्यांचे गाडीवान अशी वाहतुकीची व्यवस्था त्या काळच्या शहरांतील सर्वांत मोठी समस्या होती. त्यावर विचारमंथन खूप होत होते, पण तोडगे सापडत नव्हते. अठराव्या शतकातीलही घोड्यांच्या वाहतुकीची आणि नागरी परिसरातील दुर्गंधी आणि अनारोग्यकारी परिसराची गंभीर समस्या सोडविली ती विसाव्या शतकातील मोटारींनी. मोटारी, बसेस आणि विजेवरच्या ट्रॅम रस्त्यावर धावू लागल्या. शहरातील रस्ते मोकळे झाले आणि लोकांना श्वास घेता येऊ लागला. विसाव्या शतकातील मोटारींचे यश आजच्या महानगरांच्या वाहतूक समस्येचे एक मोठे कारण बनले आहे आणि एकविसाव्या शतकाला ह्यातून मार्ग काढावाच लागणार आहे. कारण वाहतुकीच्या क्षेत्रामध्ये ज्या प्रमाणात इंधन वापरले जात आहे, मोटारी जी प्रचंड जागा व्यापत आहेत आणि वाहतूक मंदावते आहे, त्यावर उपाय शोधणे अत्यावश्यक झाले आहे आणि अशी शोधप्रक्रिया जगभरात सुरू झाली आहे. आपण मुंबईमध्ये अजूनही मागासलेल्या १९७० सालाच्या उड्डाणपुलांच्या कालबाह्य तंत्रज्ञानातच अडकलो आहोत. सिऊल ह्या कोरियाच्या राजधानीमध्ये १९७५ साली बांधलेला ५ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल २००० साली जाणीवपूर्वक तोडून ती जागा सार्वजनिक बससेवा आणि हिरव्या आकर्षक बगीच्यांसाठी विकसित केली आहे. तेथील परिसर हा आज सिऊलच्या पर्यटकांचे एक मोठे आकर्षण बनला आहे. जगातील अनेक देशांचे विशेषज्ञ आपल्याकडे येऊन मदत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु दुर्दैवाने आपले राज्यकर्ते गतकालातच रुतून बसल्यामुळे वाहतूक समस्येवर सध्या काही उपाय दिसत नाहीत. खाजगी मोटारींची संख्या मर्यादित करणे आणि त्याचबरोबर सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देऊन ती बळकट करणे हे नितांत आवश्यक आणि तातडीचे काम आहे. त्यासाठी वाहतुकीचे अर्थशास्त्र तपासणेही आवश्यक आहे. आपली लोकलसेवा अतिशय स्वस्त म्हणजे ७ पैसे प्रति किमी इतकी असल्यामुळे तिची कार्यक्षमता घटत चाललेली आहे, तर गर्दी वाढत चालली आहे. बेस्टची सेवाही कायमच तोट्यात असल्यामुळे जागतिक बँकेचे कर्ज काढण्याची आवश्यकता पडते

आहे. एकंदरीतपणे बघता वाहतुकीचे क्षेत्र अतिशय गुंतागुंतीचे असून त्याबाबत समज वाढविणे, शिक्षणसोयी वाढविणे आणि लोकशिक्षणाबरोबरच राजकीय पक्षांना शहाणे करणे हेही आवश्यक आहे. कदाचित काही क्रांतिकारी तंत्रज्ञान निर्माण होण्याची वाट न बघता लगेचच प्रयत्न सुरू करणे आवश्यक आहे. मुंबईसारख्या शहरात वाहतूक समस्येवर अभ्यास करणारी तसेच शिक्षण देणारी संस्था उभी करण्यासाठीही प्राधान्याने प्रयत्न हवे आहेत असे सुलक्षणा महाजन म्हणाल्या.

निखिल वागळे ह्यांनी मुंबईसकट महाराष्ट्रातील सर्वच शहरांमध्ये नागरी नियोजनाकडे झालेल्या दुर्लक्षाकडे लक्ष वेधले. एकाही शहरामध्ये नियोजनपूर्वक विकास करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला नाही. कागदावर केलेले नियोजन केवळ कागदावरच राहिलेले दिसते असे सांगत त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांना त्यांनी दोष दिला. अरुंद, अपुरे रस्ते, त्यावरील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे, बेशिस्त आणि समन्वयाचा अभाव अशा असंख्य समस्या आज शहरांना भेडसावत आहेत परंतु त्यावर पुरेसे विचारमंथनही होत नाही. अनागोंदीने भरलेली शहरे ही आज महाराष्ट्राला खासच भूषणावह नाहीत असे प्रतिपादन त्यांनी केले.

वक्त्यांच्या भाषणानंतर उपस्थितांपैकी अनेकांनी आपले विचार मांडले, तसेच अनेक प्रश्नही उपस्थित केले. मुंबईमधील वाहतुकीची समस्या ही गर्दीची समस्या आहे. तसेच गर्दीच्या वेळाही लांबत गेल्या आहेत असे एका उपस्थित महिलेने सोदाहरण सांगितले. तर परदेशात वास्तव्य करून आलेल्या एकांनी परदेशातील सुव्यवस्था आणि शिस्त ही आपल्या शहरात कशी आणता येईल ह्याचा विचार करणे आवश्यक आहे असे मत मांडले. दोन तासांच्या वर चाललेला हा वाहतुकीच्या विषयाचा कार्यक्रम प्रेक्षकांच्या सुजाण प्रतिसादामुळे आणि सहभागामुळे अतिशय रंगला.


## ग्रंथालीचे प्रकाशन




## वाहतूक ठप्प
## बसू नका गप्प!
### कारणे व उपाय
### अशोक दातार

वाहतूक ठप्प.... हा आपला दररोजचा चीड आणणारा अनुभव. ५५ उड्डाणपूल बांधले गेले, वांद्रे-वरळी सागरी सेतू आता जुना झाला, ही उदंड झाले. मोटारींचा महापूर वाढतोच आहे आणि मुंबईकरांनी, वाहतूक सुरळीत होईल ही आशाच आता सोडून दिली आहे. मुंबईतच नव्हे तर इतर शहरात देखील वाहतूक कोंडीचा गळफास लोकांना जाणवू लागलाय. यावर काही कठोर, प्रामाणिक परंतु निश्चित आणि परिणामकारक असे उपाय या पुस्तकात सुचविले आहेत. हे पुस्तक आपल्याला, ''आहे हे असेच चालणार आणि परिस्थिती अधिकच बिकट होणार आहे. पर्यावरणाविषयी केवळ बोलायचे असते, त्यासाठी आपण करायचे काहीच नसते आणि शेवटी सरकार काय करणार आहे ते आपल्याला माहीतच आहे, कशाला वेळ घालवा'' या मनोवृत्तीतून बाहेर काढून असा आशावाद जागृत करेल ही अपेक्षा!

**मूल्य १२० रुपये । सवलतीत ७० रुपये**